**मनोगत**

महसूल खात्यातील अधिकारी आणि कर्मचारी यांना नेहमीच संभ्रमात टाकणारा विषय म्हणजे वारस विषयक तरतुदी. हा विषय अत्यंत किचकट असून हिंदू, मुस्लिम आणि पारसी धर्मियांसाठी यात भिन्न तरतुदी समाविष्ट आहेत. महसूल खात्यात अनेक वेळा सर्व धर्मिय वारसांच्या नोंदी हिंदू धर्मिय लोकांना लागू असलेल्या कायद्यानुसार नोंदविल्या जातात. यामुळे भविष्यात अनेक कायदेशीर गुंतागुत निर्माण होण्याची शक्यता असते. वारस नोंद हा विषय तलाठी स्तरापासून ते अधिकारी स्तरापर्यंत अनेक वेळा हाताळला जातो. हा विषय किचकट असल्याने याबाबतीतला प्रकरणे काहीशी उपेक्षीत असतात.

महसूल खात्यातील दुसरा किचकट व संभ्रमात पाडणारा विषय म्हणजे मृत्यूपत्राची नोंद. अनेक वेळा तलाठी स्तरावर मृत्यूपत्राच्या नोंदी चुकीच्या घेतल्या जातात किंवा संबंधीताला न्यायालयाचा रस्ता दाखविण्यात येतो. अधिकारी स्तरावरही याबाबत बराच संभ्रम आहे.

खरेतर वारस नोंद किंवा मृत्यूपत्राची नोंद हा खुप काळजीपूर्वक व कायदेशीर तरतुदींचे काटेकोर पालन करुन हाताळण्याचा विषय आहे. यात वारसा हक्क समाविष्ट असल्याने तो सामान्य जनतेसाठीही जिव्हाळ्याचा विषय आहे.

वारस विषयक तरतुदी आणि मृत्यूपत्राची नोंद याबाबत महसूल खात्यातील अधिकारी आणि कर्मचारी यांचा संभ्रम दुर व्हावा या दृष्टीकोनातून "हिंदू, मुस्लिम, पारसी वारसा कायदे आणि मृत्यूपत्राबाबत महत्वाच्या तरतुदी" हा लेख  जमेल तितक्या सोप्या भाषेत तयार करुन सादर करीत आहे.

हा लेख म्हणजे कोणत्याही वारस किंवा मृत्यूपत्र विषयक कायद्याला पर्याय आहे असा माझा दावा मुळीच नाही. जरूर तेथे मूळ कायद्याचे पुस्तक वाचणे आवश्यक आहेच याची कृपया नोंद घ्यावी.

या लेखातील वारस किंवा मृत्यूपत्र विषयक तरतुदी, त्यांबाबत जास्तीत जास्त माहिती मिळावी या दृष्टिकोनातून सोप्या भाषेत लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. महसूल खात्यातील अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासह समाजातील सर्वच स्तरांसाठी हा लेख उपयुक्त ठरेल अशी अपेक्षा आहे.

हा लेख परिपूर्ण करण्याचा प्रयत्न केला असला तरी यात काही त्रुटी किंवा चुका असण्याची शक्यता नाकारता येत नाही. आवश्यक तेथे अद्ययावत तरतुदींचा संदर्भ घ्यावा ही विनंती.

**डॉ. संजय कुंडेटकर**
बी.ए., एन.डी., डी.मॅग., एम.बी.ए.,
एम.डी., पीएच.डी.
उपजिल्हाधिकारी,
महाराष्ट्र शासन, (महसूल विभाग)

| अनुक्रमणिका | | |
|---|---|---|
| अनुक्रमांक | विषय | पान नंबर |
| १ | भारतीय उत्तराधिकार (वारसा) अधिनियम १९२५ (महत्वाच्या तरतुदी) कलम ३२ ते ४९ | |
| २ | हिंदू उत्तराधिकार अधिनियम- १९५६ (महत्वाच्या तरतुदी) | |
| ३ | हिंदू उत्तराधिकार अधिनियम-१९५६, कलम ८ अन्वये वर्ग १, वर्ग २, वर्ग ३ आणि वर्ग ४ च्या वारसांची अनुसूची | |
| ४ | हिंदू उत्तराधिकार अधिनियम-१९५६ अन्वये हिंदू स्त्रिची मालमत्ता | |
| ५ | हिंदू उत्तराधिकार ( सुधारणामहाराष्ट्र) अधिनियम १९९४ (महत्वाच्या तरतुदी) | |
| ६ | हिंदू उत्तराधिकार (सुधारणा) अधिनियम-२००५ (महत्वाच्या तरतुदी) | |
| ७ | महत्वाचे शब्दार्थ | |
| ८ | महत्वाचे न्याय निर्णय | |
| ९ | एकत्र हिंदू कुटुंबातील मिळकतीचे वाटप | |
| १० | एकत्र कुटुंब मॅनेजरने एकत्र कुटुंबाची मिळकत विकणे | |
| ११ | मुस्लिम वारसा विषयक सर्वसाधारण नियम (हनाफी- सुन्नी पंथ) | |
| १२ | मुस्लिम वारसा विषयक सर्वसाधारण नियम (शिया पंथ( | |
| १३ | भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ मधील पारसी धर्मियांसाठी वारसाचे नियम | |
| १४ | हिंदू धर्मिय व्यक्तीच्या मृत्यूपत्राबातच्या तरतुदी | |
| १५ | मुस्लिम धर्मिय व्यक्तीच्या मृत्यूपत्राबातच्या तरतुदी | |
| १६ | वारस दाखले | |
| १७ | शब्दार्थ | |

## १. भारतीय उत्तराधिकार (वारसा) अधिनियम १९२५ (महत्वाच्या तरतुदी)

भारतीय उत्तराधिकार (वारसा) अधिनियम ३० सप्टेंबर १९२५ रोजी अंमलात आला. त्याद्वारे परंपरेशी संबंधित सर्व भारतीय कायदे एकत्र करण्यात आले. या कायद्यात ११ भाग, ३९१ कलमे आणि ७ परिशिष्ट यांचा समावेश आहे. हा कायदा एकत्र कुटुंबातील, मृत्यूपत्र न करता मयत झालेल्या व्यक्ती आणि मृत्यूपत्र केलेले असल्यास त्यात नमूद उत्तराधिकारी यांना लागू आहे.

ब्रिटीशांना भारतात राज्य करतांना कायदे आनुषंगीकरित्या चालविणे आवश्यक झाले. यात मुख्यत: हिंदू आणि मुस्लिम धर्मीयांचा विशेष विचार करणे आवश्यक होते कारण या दोन्ही समुदायाचे स्वत:चे वैयक्तिक कायदे त्यांच्या पवित्र ग्रंथांमध्ये दिलेले होते. याशिवाय अल्प लोकसंख्या असलेले पारसी, ख्रिश्चन इत्यादी इतर समुदायही होते, ज्यांची हिंदू किंवा मुस्लिम धर्मावर निष्ठा नव्हती आणि ते हिंदू आणि मुस्लिम धर्मीयांपेक्षा भिन्न होते. या समुदायांवर हिंदू किंवा मुस्लिम धर्मीय कायदे लादणे योग्य नव्हते. या सर्वांचा विचार करुन भारतीय वारसाहक्क कायदा बनविण्यात आला.

सर्वसाधारणपणे मुस्लिम धर्मीय वगळता इतर सर्व धर्मीयांना उदा. हिंदू, ख्रिश्चन, पारसी इत्यादींना हा कायदा लागू होतो. भारतीय मुस्लीमांना या कायद्यातील फक्त काही तरतुदी लागू होतात. कोणत्या तरतुदी कोणत्या धर्माला लागू पडतील अथवा पडणार नाही हे त्या तरतुदीमध्येच या कायद्यात स्पष्टपणे दिलेले आहे.

या कायद्यान्वये मृत्यूपत्र न करता मयत झालेल्या हिंदू, मुसलमान व पारसी वगळता इतर धर्मीय व्यक्तींचे वारस ठरविणेसाठी प्रमुख तरतुदी खालीलप्रमाणे आहेत:-

**कलम ३२ :** मृत्यूपत्र न करता मृत्यू पावलेल्या व्यक्तीची मिळकत प्रथम त्या व्यक्तीची पत्नी किंवा पती अथवा अपत्ये व जवळचे नातेवाईक यांना पुढे दिलेल्या नियमांप्रमाणे वारसाने मिळते.
***स्पष्टीकरण-*** जर विवाहापूर्वीच विशिष्ट अधिकृत कराराने एखाद्या स्त्रिला तिच्या पतीच्या मिळकतीतील हिस्सा वारसाने मिळणार नाही असे ठरले असेल तर पतीच्या निधनानंतर त्याची विधवा म्हणून तिला कोणताही हक्क प्राप्त होणार नाही.

**कलम ३३ :** जेव्हा मृत्यूपत्र न करता मयत झालेल्या व्यक्तीच्या मागे त्याची (अ) विधवा आणि वंशपरंपरागत वंशज किंवा (ब) विधवा आणि जन्माने जोडले गेलेले नातेवाईक/ अपत्ये असतील किंवा फक्त (क) विधवा असेल तर
उपरोक्त (अ) प्रमाणे असेल तर मयताच्या मिळकतीतील १/३ (एक त्रित्यांश) भाग त्या विधवेला दिला जाईल व उर्वरित २/३ (दोन त्रित्यांश) हिश्याचीविभागणी नियमाप्रमाणे केली जाईल.
उपरोक्त (ब) प्रमाणे असेल तर मयताच्या मिळकतीतील १/२ (अर्धा हिस्सा) विधवेला मिळेल व उर्वरित १/२ (अर्धा हिस्सा) जन्माने जोडले गेलेल्या नातेवाईक/आपत्यांना मिळेल.
उपरोक्त (क) प्रमाणे असेल तर मयताच्या मिळकतीतील संपूर्ण मिळकत मयताच्या विधवेला मिळेल.
**कलम ३३(अ) :** (१) जेव्हा मयतामागे अपत्य अगर जवळचे नातेवाईक नसतात आणि फक्त विधवा असते तेव्हा आणि मयत व्यक्तीच्या मिळकतीचे मूल्य रुपये पाच हजार पेक्षा जास्त नसेल तर संपूर्ण मिळकत त्या मयताच्या विधवेला मिळते.

(२) जेव्हा उपरोक्त परिस्थितीत मिळकतीचे मूल्य रु. पाच हजारपेक्षा जास्त असेल अशावेळी त्या संपूर्ण मिळकतीवर त्या विधवेचा रुपये पाच हजारचा भार राहील आणि विधवेच्या पतीच्या मृत्यूच्या दिनांकापासून तर प्रत्यक्ष रक्कम मिळेपर्यंत द. सा. द. शे. ४ टक्के व्याजासह ती रक्कम मिळविण्याचा तिला अधिकार असेल.

(३) रुपये पाच हजारची केलेली तरतूद ही कलम ३३ मध्ये विधवेस दिलेल्या हक्काच्या अतिरिक्त असून त्याशिवाय उर्वरित मिळकतीची विभागणी कलम ३३ मधील तरतुदीप्रमाणे होईल.

(४) मिळकतीचे फक्त मूल्य ठरविताना त्यावरील देणे (कर्ज), मयताच्या उत्तरक्रियेसाठी व मिळकत व्यवस्थापनसाठी झालेला खर्च एकूण मूल्यातून वजा केला जातो.

(५) हे कलम खालील समाजघटकांना लागू पडणार नाही-

अ) भारतीय ख्रिश्चन

ब) मयताचे, त्याच्या मृत्यू समयी ख्रिश्चन असलेलेले नातू/नात किंवा मुले.

क) हिंदू, बौद्ध, शिख आणि विशेष विवाह नोंदणी कायदा १८७२ च्या कलम २४ च्या तरतुदी लागू असणाऱ्या व्यक्ती.

ड) मृत्युपत्र केलेल्या व्यक्ती.

**कलम ३४ :** जेव्हा मयत व्यक्तीच्या मागे त्याची विधवा किंवा जन्माने जोडले गेलेल्या नातेवाईक/आपत्यांपैकी कोणीही नसते तेव्हा मयताची मिळकत त्याच्या नातेवाईकांकडे नियमाप्रमाणे जाते. जेव्हा वरील कोणीही वारस शिल्लक नसेल तेव्हा ती मिळकत सरकारजमा होते.

**कलम ३५ :** विधवेला जे हक्क तिच्या पतीच्या मिळकतीत मिळतात तेच हक्क मृत्यूपत्र न करता मृत झालेल्या विधूर पतीला मयत पत्नीच्या मिळकतीत मिळतात.

**कलम ३६ :** मयताच्या मिळकतीची वाटणी (विधवा असल्यास, तिचा हिस्सा वजा केल्यानंतर) मयताच्या अपत्यांमध्ये विभागणी करण्याचे नियम कलम ३७ ते ४० मध्ये दिलेले आहेत.

**कलम ३७ :** जेव्हा मयत व्यक्तीमागे एकच अपत्य असेल व इतर कोणीही पूर्वी मयत झालेल्या अपत्याचे अपत्य नसेल तेव्हा पूर्ण मिळकत जिवंत असणाऱ्या त्या एकट्या अपत्याच्या मालकीची होईल. एकापेक्षा जास्त अपत्ये असतील तर त्या सर्वामध्ये ती समान हिश्श्याने वाटली जाईल.

**कलम ३८ :** जेव्हा मयतामागे कोणतेही अपत्य नसते मात्र अपत्याचे अपत्य अगर अपत्ये असतात. आणि इतर दूरचे मयत अपत्यामार्फतचे कोणी जिवंत नसते, तेव्हा जिवंत आसणाऱ्या अपत्याचे अपत्य (नात किंवा नातू) एकच असल्यास संपूर्ण मिळकत त्याच्याकडे जाईल व अशी एकापेक्षा जास्त आपत्ये असल्यास त्यांच्यामध्ये समान हिस्स्यात विभागली जाईल.

**कलम ३९ :** अशा प्रकारे मयत व्यक्तीची मिळकत वंशपरंपरेने येणाऱ्या वारसाकडे संक्रमीत होते.

**कलम ४० :** १) जेव्हा मयत व्यक्तीमागे शिल्लक असलेले वारस एकापेक्षा जास्त पिढीच्या अंतराने दुरचे व नजिकचे असे मिश्र स्वरूपात शिल्लक राहतात तेव्हा मयताच्या मिळकतीचे त्याचे अपत्यजन वारस व नातेवाईक विचारात घेऊन हिस्से करून सर्व कायदेशीर वारसांना हिस्से मिळतील असे वाटप होईल.

२) वरीलप्रमाणे असलेल्या हिश्यातील प्रत्येक हिस्सा वंशावळीनुसार अति नजिकच्या वारसास तर प्रत्येकी एक अशा मृत वारसास दिले जातात व असे हिस्से या वारसांच्या पुढील उत्तराधिकाऱ्याकडे संक्रमीत होतील अशा पध्दतीने वाटप केले जाते.

**कलम ४१ :** जेव्हा मृत व्यक्तीच्या मागे त्याच्या वंशवेलीतील कोणीही वारस नसतो तेव्हा इतर नातेवाईकामध्ये (विधवा जिवंत असल्यास तिचा हिस्सा वगळून) मृत व्यक्तीच्या मिळकतीचे विभाजन कलम ४२ ते कलम ४८ मध्ये दिलेल्या तरतुदी प्रमाणे केले जाते.

**कलम ४२ :** जर मृत व्यक्तीचे वडील जिवंत असतील तर ते मृत व्यक्तीचे उत्तराधिकारी ठरतील.

**कलम ४३ :** जेव्हा मृत व्यक्तीचे वडील जिवंत नसतात पण आई, भाऊ व बहिणी जिवंत असतात व कोणीही भाऊ किंवा बहीण मयत नसते तेव्हा व्यक्तीच्या मिळकतीचे समान हिस्से करुन आई, भाऊ व बहिणी यांना दिले जातात.

**कलम ४४ :** जेव्हा मृत व्यक्तीचे वडील जिवंत नसतात पण आई, भाऊ, बहिणी व मयत भाऊ व बहिणीची मुले जिवंत असतात तेव्हा मृत व्यक्तीच्या मिळकतीचे आई, जिवंत व मयत भाऊ, बहिणीच्या संख्येइतके समान हिस्से केले जातात व प्रत्येकी एक याप्रमाणे आई, जिवंत भाऊ, बहिणी व मयत भाऊ, बहिणीचे वारस यांना दिले जातात.

**कलम ४५ :** जर मृत व्यक्तीचे वडील जिवंत नाहीत पण आई जिवंत आहे आणि सर्व भाऊ-बहिणी मयत असून त्यांची मुले, मुली जिवंत आहेत असे असेल तर आई व मयत भाऊ-बहिण यांच्या संख्येइतके समान हिस्से गृहित धरून मिळकतीचे वाटप होईल. असे हिस्से संबंधित मयत भाऊ, बहिणी यांच्या वारसाकडे संक्रमीत होतील.

**कलम ४६ :** जेव्हा मृत व्यक्तीस त्याच्या आईशिवाय कोणीही वारस शिल्लक नसते तेव्हा अशा व्यक्तीची संपूर्ण मिळकत आईकडेच जाते.

**कलम ४७ :** जेव्हा मृत व्यक्तीचे आई वडील मयत असतात तेव्हा त्याची मिळकत त्याचे जिवंत व मयत भाऊ-बहिणी यांचेमध्ये समान हिस्स्याने वाटली जाते. मयतांचे हिस्से त्यांच्या वारसांकडे संक्रमीत होतात.
**कलम ४८ :** जेव्हा मृत व्यक्तीस आई, वडील, भाऊ, बहिणी किंवा त्यांचे वारस असे कुणीही उत्तराधिकारी नसतात तेव्हा मृत व्यक्तीच्या नजिकच्या पिढीतील जे नातेवाईक हयात असतील त्यांना सम-समान हिश्याने मृताची मिळकत मिळेल.

**कलम ४९** : जेव्हा मृत व्यक्तीच्या मिळकतीचे त्याच्या मुलांमध्ये किंवा वारसांमध्ये विभाजन केले जाते तेव्हा मृत व्यक्तीचे वारस हक्क मागणाऱ्या मुलाच्या, मुलीच्या अगर त्यांच्या अपत्याच्या पालनपोषणासाठी व विकासासाठी केलेला खर्च मिळकतीचे अथवा हिस्याचे मूल्यांकन करताना विचारात घेतला जात नाही.

## २. हिंदू उत्तराधिकार अधिनियम- १९५६ (महत्वाच्या तरतुदी)

१७ जुन १९५६ या दिनांकापासून हिंदू उत्तराधिकार अधिनियम-१९५६ अंमलात आला. या कायद्यामुळे प्रचलित हिंदू वारसा पध्दतीमध्ये बदल होऊन तो कायदा संहिताबध्द (कोडिफाय) झाला आणि एकत्र कुटुंबातील विनामृत्युपत्र मिळकतीचा वारसा कोणाकडे जातो हे या कायद्याने ठरविले गेले.

१७ जुन १९५६ या दिनांकापूर्वीच्या वारसा संबंधीचा विचार, त्यावेळेस प्रचलित रितीरिवाजाप्रमाणे तर १७ जुन १९५६ या दिनांकापूर्वी विधवा झालेल्या स्त्रिच्या बाबतीत 'द वुमेन्स राईट टु प्रॉपर्टी ॲक्ट', १९३७ (१४/४/१९३७) अन्वये केला जातो. १७ जुन १९५६ या दिनांकानंतर मयत झालेल्या स्त्री किंवा पुरुष यांच्या मिळकतीवरील वारसा हक्क हिंदू उत्तराधिकार अधिनियम-१९५६ प्रमाणे ठरतो.

सन १९५६ पूर्वी, हिंदू कायद्याप्रमाणे एकत्र कुटुंबातील सहहिस्सेदारास 'सहदायक (कोपार्सनर)' असे म्हटले जात असे. सहदायक मयत झाला तर त्याचा वारसा इतर सहदायकांकडे जात असे. त्यामुळे सन १९५६ पूर्वी वारसा हा 'उत्तरजीवीता (सर्व्हायवरशिप)' ने होता असे म्हणतात.
सन १९५६ पूर्वी जर एखादा एकत्र कुटुंबात राहणारा परंतू त्याची स्वतंत्र मिळकत असलेला इसम मयत झाला तर त्याच्या मिळकतीचा 'उत्तराधिकार (सक्सेशन)' हा त्याच्या वारसांकडे जात असे. म्हणजेच सन १९५६ पूर्वी 'उत्तरजीवीता (सर्व्हायवरशिप)' आणि 'उत्तराधिकार (सक्सेशन)' अशा हक्क प्राप्त होणाऱ्या दोन वेगवेगळ्यात पध्दती होत्या.

**हिंदू उत्तराधिकार अधिनियम-१९५६ खालील व्यक्तींना लागू आहे :**
(अ) जी व्यक्ती धर्माने हिंदू आहे (वीरशैव, लिंगायत, ब्राम्हो समाज, प्रार्थना समाज, आर्य समाजाचे अनुयायी)
(ब) जी व्यक्ती धर्माने बौध्द, जैन किंवा शिख आहे. किंवा हिंदू, बौध्द, जैन किंवा शिख धर्मात धर्मांतरित किंवा पुनर्धर्मांतरित झालेली आहे.
(क) जी व्यक्ती धर्माने मुस्लिम, ख्रिस्ती, पारसी किंवा ज्यू नाही.

**कलम ५ :** हा अधिनियम विशेष विवाह अधिनियम, १९५४ च्या कलम २१ मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदींमुळे भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ द्वारे विनियमित होणाऱ्या कोणत्याही मिळकतीस/संपत्तीस लागू असणार नाही.

**कलम ६ :** या कलमान्वये, या अधिनियमाच्या प्रारंभानंतर जर हिंदू पुरूषाचा मृत्यू झाला तर त्याच्या मृत्यू समयी ज्या मिताक्षरा सहदायिकी (कोपार्सनर) मालमत्तेत त्याचा हितसंबंध असेल अशा बाबतीत त्याच्या त्या मालमत्तेतील हितसंबंध या अधिनियमान्वये नाही तर उत्तरजीवीताच्या (सर्व्हायवरशिप) तत्वानुसार सहदायिकीतील (कोपार्सनर) उत्तरजीवी सदस्यांकडे प्रक्रांत होईल.

परंतू मृताच्यामागे वर्ग १ मध्ये समाविष्ट असणाऱ्या स्त्री नातलग किंवा अशा स्त्री नातलगामार्फत दावा सांगणारा पुरूष नातलग हयात असल्यास मृताचा मिताक्षर सहदायिकी (कोपार्सनर) मालमत्तेतील हितसंबंध उत्तरजीवीताच्या (सर्व्हायवरशिप) तत्वानुसार नव्हे तर या अधिनियमान्वये प्रक्रांत होईल.

## ३. हिंदू उत्तराधिकार अधिनियम-१९५६, कलम ८ अन्वये वर्ग १ च्या वारसांची अनुसूची

**कलम ८: पुरूषांच्या बाबतीत उत्तराधिकाराचा क्रम:**

**अ)** प्रथमत: त्याच्या वर्ग एकच्या वारसांकडे जातो.

अविभक्त हिंदू कुटुंबातील एखादा पुरूष विना मृत्यूपत्र मयत झाला तर त्याचा वारसा सर्वप्रथम पुढील बारा जणांना वर्ग १ चे वारस म्हणून मिळतो.

**वर्ग १ चे १२ +४ =१६ वारस** **मयताचा (१)** मुलगा **(२)** मुलगी **(३)** विधवा (एकाहून अधिक विधवा असतील तर सर्व विधवांना एकत्रीतपणे हिस्सा मिळेल) **(४)** मयताची आई **(५)** पूर्वमृत मुलाचा मुलगा **(६)** पूर्वमृत मुलाची मुलगी **(७)** पूर्वमृत मुलीचा मुलगा **(८)** पूर्वमृत मुलीची मुलगी **(९)** पूर्वमृत मुलाची विधवा **(१०)** पूर्वमृत मुलाच्या पूर्वमृत मुलाचा मुलगा **(११)** पूर्वमृत मुलाच्या पूर्वमृत मुलाची मुलगी **(१२)** पूर्वमृत मुलाच्या पूर्वमृत मुलाची विधवा हे एकाचवेळी हिस्सा घेतील.

☞ **हिंदू उत्तराधिकार (सुधारणा) अधिनियम- २००५, कलम ७ अन्वये वर्ग १ च्या वारसांच्या अनुसूचीमध्ये खालील चार वारस जोडले गेले आहेत.**

**(१३)** पूर्वमृत मुलीच्या पूर्वमृत मुलीचा मुलगा **(१४)** पूर्वमृत मुलीच्या पूर्वमृत मुलीची मुलगी

**(१५)** पूर्वमृत मुलाच्या पूर्वमृत मुलीची मुलगी **(१६)** पूर्वमृत मुलाच्या पूर्वमृत मुलीचा मुलगा

**ब)** अविभक्त हिंदू कुटुंबातील एखादा पुरूष विना मृत्यूपत्र मयत झाला आणि त्याला वरील वर्ग १ चे कोणीही वारस नसतील तर दुसऱ्यांदा वर्ग २ च्या वारसांकडे त्याचा वारसा जाईल.

**हिंदू उत्तराधिकार अधिनियम-१९५६, कलम ८ अन्वये वर्ग २ च्या वारसांची अनुसूची**

**वर्ग २ चे ९ वारस** **(एक)** *१)* वडील

**(दोन)** *१)* मुलाच्या मुलीचा मुलगा *२)* मुलाच्या मुलीची मुलगी *३)* भाऊ *४)* बहीण

**(तीन)** *१)* मुलीच्या मुलाचा मुलगा *२)* मुलाच्या मुलाची मुलगी *३)* मुलीच्या मुलाचा मुलगा

*४)* मुलीच्या मुलीची मुलगी

**(चार)** *१)* भावाचा मुलगा *२)* बहिणीचा मुलगा *३)* भावाची मुलगी *४)* बहिणीची मुलगी

**(पाच)** *१)* वडीलांचे वडील *२)* वडीलांची आई

**(सहा)** १) वडीलांची विधवा *२)* भावाची विधवा

**(सात)** *१)* वडीलांचा भाऊ *२)* वडीलांची बहीण

***(आठ)*** *१)* आईचे वडील *२)* आईची आई

**(नऊ)** *१)* आईचा भाऊ *२)* आईची बहीण

**क)** अविभक्त हिंदू कुटुंबातील एखादा पुरूष विना मृत्यूपत्र मयत झाला आणि त्याला वरील वर्ग १ आणि वर्ग २ चे कोणीही वारस नसतील तर खालील वर्ग ३ च्या मृताच्या गोत्रजांकडे त्याचा वारसा जाईल.

**वर्ग ३ चे मृताचे गोत्रज खालील प्रमाणे आहेत :**

**वर्ग ३- मृताचे गोत्रज** मृताचे पितृबंधू, म्हणजेच रक्ताच्या संबंधामुळे किंवा दत्तक ग्रहणामुळे पूर्णपणे पुरुषांद्‌वारे संबंध असलेल्या व्यक्ती.

**ड)** अविभक्त हिंदू कुटुंबातील एखादा पुरूष विना मृत्यूपत्र मयत झाला आणि त्याला वरील वर्ग १ वर्ग २ आणि वर्ग ३ चे कोणीही वारस नसतील तर शेवटी खालील वर्ग ४ च्या, मृताच्या भिन्न गोत्रज असणाऱ्यांकडे मयताची संपत्ती वारसा हक्काने जाते.

**वर्ग ४ चे मृताचे भिन्न गोत्रज** मयताचे मातृबंधू, म्हणजेच, रक्ताच्या नात्यामुळे किंवा दत्तक ग्रहणामुळे परंतू पूर्णपणे पुरुषांद्वारे संबंध नसलेल्या व्यक्ती.

**कलम ९: उत्तराधिकाराचा क्रम :**

✓ उपरोक्त वारसांच्या वर्गवारीत वर्ग एकमध्ये समाविष्ट असलेल्या वारसांना एकाच वेळी मालमत्ता मिळेल आणि वर्ग दोन, तीन आणि चारचे वारस वर्जित होतील.

✓ वर्ग दोनच्या वारसांना मालमत्ता मिळणार असेल तेव्हा वर्ग दोनच्या पहिल्या नोंदीत येणाऱ्या (वडील) वारसांना, दुसऱ्या नोंदीतील वारसांपेक्षा (मुलाच्या मुलीचा मुलगा, मुलाच्या मुलीची मुलगी, भाऊ, बहीण) प्राधान्य मिळेल. याप्रमाणे पुढे.

**कलम १० : वर्ग १ मधील वारसामध्ये संपत्तीचे वितरण :**

अकृतमृत्युपत्र व्यक्तीस वर्ग एक मधील वारस असतील तर त्याच्या मालमत्तेचा भाग त्यांच्यात पुढील नियमानुसार विभागला जाईल :-

***नियम १ -*** मयताची विधवा, किंवा एकाहून अधिक विधवा असतील तर सर्व विधवा एकत्रितपणे एक हिस्सा घेतील.

***नियम २ -*** मयत व्यक्तीचे हयात मुलगे आणि मुली आणि आई प्रत्येकी एक हिस्सा घेतील.

***नियम ३ -*** मयत व्यक्तीच्या प्रत्येक मयत मुलाच्या किंवा प्रत्येक मयत मुलीच्या खात्यातील वारस त्यांच्यात मिळून एक हिस्सा घेतील.

***नियम ४ -*** नियम ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या हिस्स्यांचे वितरण मयत व्यक्तीच्या मयत मुलाच्या खात्यातील वारसांमध्ये अशा प्रकारे करण्यात येईल की, त्याची विधवा (किंवा त्याच्या विधवा एकत्रितपणे) आणि हयात मुलगे व मुली यांना समान अंश मिळतील आणि त्याच्या मयत मुलांच्या शाखेला तेवढाच अंश मिळेल.

मयतास वरील वर्ग १) पैकी कोणीही वारस नसेल तर पुढील वर्ग २) च्या वारसांकडे मयताची संपत्ती वारसा हक्काने जाते.

**कलम ११ : वर्ग २ मधील वारसामध्ये संपत्तीचे वितरण:**

**मयतास** वर्ग १) मधील वारस नसल्यास वर्ग २) मधील वारस विचारात घेतले जातात. तथापी, वर्ग १) मधील वारसाप्रमाणे एकसमयावच्छेदेकरून हिस्सा मिळण्याचा हक्क वर्ग २) मधील वारसांना नाही. (अकृतमृत्युपत्र व्यक्तीची) संपत्ती प्रथमत: वर्ग २) (एक) मध्ये नमुद केलेल्या वारसांकडे समान हिश्श्यांमध्ये प्रक्रांत होईल. वर्ग २) (एक) मधील वारस नसल्यास ती वर्ग २) (दोन) मध्ये नमुद केलेल्या वारसांकडे (समान हिस्स्यांमध्ये) प्रक्रांत होईल. वर्ग २) (एक) आणि (दोन) मधील वारस नसल्यास, ती वर्ग २) (तीन) मधील सर्व वारसांकडे समान हिश्श्यांमध्ये प्रक्रांत होईल. आणि याप्रमाणे पुढे.

<u>**टीप-**</u> वर्ग दोनमधील भाऊ किंवा बहीण यामध्ये एकच आई परंतु भिन्न वडील असलेला भाऊ किंवा बहीण यांचा समावेश होत नाही. विनामृत्युपत्र खातेदाराची संपत्ती सर्वांना समान हिस्सा मिळेल अशा प्रकारे वर्ग २) मध्ये नमूद

केलेल्या वारसांमध्ये वाटली जाईल. उदाहरणार्थ, २) (एक) मध्ये नमुद केलेले वडील वारस असल्यास सर्व संपत्ती त्यांना मिळेल. वडील हयात नसल्यास सर्व संपत्ती २) (दोन) मधील सर्व वारसांकडे समप्रमाणात प्रक्रांत होईल.

अकृतमृत्युपत्र व्यक्तीस वरील वर्ग १) आणि वर्ग २) पैकी कोणीही वारस नसेल तर पुढील वर्ग ३) च्या मृताचे गोत्रज असणाऱ्या वारसांकडे मयताची संपत्ती वारसा हक्काने जाते.

## ४. हिंदू उत्तराधिकार अधिनियम-१९५६ अन्वये हिंदू स्त्रिची मालमत्ता

**कलम १४ : हिंदू स्त्रिची मालमत्ता :**

या अधिनियमापूर्वी किंवा नंतर, हिंदू स्त्रिची, तिच्या कब्जात असलेली कोणतीही संपत्ती, मग अशी मालमत्ता तिला विवाहापूर्वी किंवा नंतर वारसाहक्काने, मृत्यूपत्रीय दानाने, वाटणीमध्ये पोटगी म्हणून, नातलगांकडून मिळालेली असो किंवा तिने अशी मालमत्ता स्वत:च्या कौशल्याने, परिश्रमाने किंवा एखादी संपत्ती दान म्हणून, मृत्यूपत्रान्वये, इतर कोणत्याही लेखान्वये, दिवाणी न्यायालयाच्या हुकूमनाम्यान्वये, आदेशान्वये किंवा एखाद्या निवाड्यान्वये संपादित केली गेली असेल किंवा अन्य कोणत्याही मार्गाने संपादित केलेली असो, अशी संपत्ती, हिंदू स्त्री संपूर्ण स्वामी म्हणून धारण करील, मर्यादित स्वामी म्हणून नव्हे.

तथापि, असे दानपत्र, मृत्युपत्र, अन्य लेख, हुकूमनामा, आदेश किंवा निवाडा काही अटी किंवा शर्तींच्या आधिन ठेवल्यामुळे संपत्तीत निर्बंधीत अधिकार निर्माण होत असतील तर अशा संपत्तीला या अधिनियमाचे उपबंध लागू होणार नाहीत.

**कलम १५ : विनामृत्युपत्र मयत हिंदू स्त्रिची मालमत्ता :**

(१) विनामृत्यूपत्र मयत झालेली हिंदू स्त्री खातेदाराची संपत्ती पुढील प्रमाणे वारसाहक्काने जाईल.

अ) पहिल्यांदा, मुलगे व मुली (कोणताही मयत मुलगा किंवा मुलगी यांची अपत्ये धरून) आणि पती यांच्याकडे

आ) दुसऱ्यांदा, पतीच्या वारसाकडे

इ) तिसऱ्यांदा, तिच्या माता आणि पिता यांच्याकडे

ई) चवथ्यांदा, पित्याच्या वारसाकडे आणि

उ) शेवटी, मातेच्या वारसांकडे कलम १६ मध्ये दिलेल्या नियमानुसार प्रक्रांत होईल.

तथापि,

(क) हिंदू स्त्री जर विनामृत्यूपत्र मरण पावली तर तिला तिच्या पित्याकडून किंवा मातेकडून वारसा हक्काने मिळालेली कोणतीही संपत्ती त्या मृत स्त्रिचा कोणताही मुलगा किंवा मुलगी (कोणत्याही मयत मुलाची किंवा मुलीची अपत्ये धरून) यांच्याकडे जाईल. असे वारस नसल्यास अशी संपत्ती मृत स्त्रिच्या पित्याच्या वारसाकडे प्रक्रांत होईल आणि

(ख) हिंदू स्त्रिला तिच्या पतीकडून किंवा तिच्या सासऱ्याकडून वारसा हक्काने मिळालेली कोणतीही संपत्ती, त्या मृत स्त्रिचा कोणताही मुलगा किंवा मुलगी (कोणत्याही मयत मुलाची किंवा मुलीची अपत्ये धरून) यांच्याकडे जाईल. असे वारस नसल्यास, मृत स्त्रिच्या पतीच्या वारसाकडे प्रक्रांत होईल.

**कलम १६ :** वरील कलम १५ मध्ये निर्दिष्ट केलेल्या वारसांमधील उत्तराधिकाराचा क्रम पुढील नियमानुसर असेल :

***नियम १ -*** कलम १५(१)(अ) मध्ये विनिर्दिष्ट केलेले वारस त्यानंतर १५(१)(आ) मध्ये नमुद केलेले वारस आणि याप्रमाणे पुढे. तथापि, एकाच नोंदीत समाविष्ट असलेल्या वारसांना एकसमयावच्छेदेकरून वारसा मिळेल.

***नियम २ -*** जर अकृतमृत्यूपत्र व्यक्तीचा कोणताही मुलगा किंवा मुलगी, अकृतमृत्यूपत्र व्यक्तीच्या आधी मृत्यू पावला किंवा पावली असून, त्यांच्या मागे त्याची किंवा तिची स्वत:ची अपत्ये अकृतमृत्यूपत्र व्यक्तीच्या मृत्यूसमयी हयात असतील तर, अशी मुलाची किंवा मुलीची अपत्ये त्यांच्यात मिळून, असा मुलगा किंवा मुलगी अकृतमृत्यूपत्र व्यक्तीच्या मृत्यूसमयी हयात असता किंवा असती तर त्यांनी जो घेतला असता तो हिस्सा घेतील.

***नियम ३ -*** अकृतमृत्यूपत्र व्यक्तीच्या संपत्तीची कलम १५ च्या पोटकलम (१) च्या खंड (आ), (इ) व (ई) व पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या वारसांकडे होणारी प्रकांती जर ती संपत्ती, यथास्थिती पित्याची किंवा मातेची किंवा पतीची

असती आणि अशी अकृतमृत्यूपत्र व्यक्तीच्या मृत्यूच्या निकटनंतर विनामृत्यूपत्र मयत झाली असती तर जो क्रम व जे नियम लागू झाले असते त्यांच्या अनुसार होईल.

**कलम १८ :** जर नातेसंबंधाचे स्वरूप अन्य प्रत्येक बाबतीत तेच असेल तर, अकृतमृत्यूपत्र व्यक्तीशी सख्ख्या नात्याने संबंधीत असलेल्या वारसांना, सापत्न नात्याने संबंधीत असलेल्या वारसापेक्षा अधिमान दिला जाईल.

**कलम २० : गर्भस्थ आपत्य :** अकृतमृत्यूपत्र खातेदाराच्या मृत्यूसमयी जे अपत्य गर्भात होते व नंतर जिवंत जन्मले, त्याला किंवा तिला जणुकाही अकृतमृत्यूपत्र व्यक्तिच्या मृत्यूपूर्वी जन्मले होते अशाच प्रकारे अकृतमृत्यूपत्र व्यक्तीचा वारस होण्याचा अधिकार असेल.

**कलम २३ : राहत्या घरासंबंधी :**
जर अकृतमृत्यूपत्र व्यक्तीला वारसदार कन्या असेल आणि जर ती अविवाहित असेल किंवा तिच्या पतीने तिला सोडून दिले असेल अथवा ती पतीपासून विभक्त झाली असेल किंवा ती विधवा असेल आणि ती अकृतमृत्यूपत्र व्यक्तीच्या घरात राहत असेल तर तिला राहत्या घरात राहण्याचा अधिकार प्राप्त होईल.

**कलम २४ :** (<u>हे कलम रद्द करण्यात आले आहे</u>) : मुलाच्या मुलाची विधवा किंवा भावाची विधवा यांनी वाटप दिनांकाच्या वेळेस दुसरे लग्न केले असेल तर त्यांना अकृतमृत्यूपत्र खातेदाराच्या संपत्तीचा वारसा मिळण्याचा हक्क मिळत नसे. <u>हे कलम आता रद्द करण्यात आले आहे</u>.

**हिस्सा मिळण्यास अपात्र व्यक्ती :** पुढील व्यक्तींना वारसाने संपत्ती मिळण्यास अनर्ह ठरण्यात आले आहे :

**कलम २५ : खुनी व्यक्ती -** जी व्यक्ती खातेदाराचा खून करेल किंवा खून करण्यास अपप्रेरणा देईल ती खून झालेल्या खातेदाराच्या संपत्तीत वारसाने अथवा उत्तराधिकाराने हिस्सा मिळण्यास अपात्र ठरेल.

**कलम २६ : धर्मांतरित व्यक्ती-** या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, एखादी व्यक्ती धर्मांतर केल्याने हिंदू राहिली नसेल तर अशी व्यक्ती, धर्मांतरानंतर तिला झालेली आपत्ये व त्यांचे वारस एकत्र कुटुंबातील संपत्तीत वारसाने अथवा उत्तराधिकाराने हिस्सा मिळण्यास अपात्र ठरतील.

**कलम २७ :** वाटपास अपात्र व्यक्ती जणू काही मयत आहे असे समजून वाटप करण्यात यावे.

**कलम २८ :** कोणतीही व्यक्ती, कोणत्याही व्याधी, वैगुण्य किंवा व्यंग असल्याच्या कारणावरून अथवा या अधिनियमात उपबंधित केलेले आहे ते खेरीज करून अन्य कोणत्याही कारणावरून कोणत्याही संपत्तीचा उत्तराधिकारी होण्यास अपात्र असणार नाही.

**कलम २९ :** जर अकृतमृत्यूपत्र व्यक्तीच्या मागे अधिनियमाच्या उपबंधानूसार त्याच्या किंवा तिच्या संपत्तीचा उत्तराधिकारी होण्यास पात्र असेलला कोणताही वारस हयात राहिला नसेल तर अशी संपत्ती शासनाकडे प्रक्रांत होईल आणि शासन ती संपत्ती, वारस ज्यांना आधिन झाला असता त्या सर्व आबंधनांच्या व दायित्वांच्या आधिनतेने घेईल.

**कलम ३० :** कोणत्याही हिंदू पुरुष किंवा स्त्रिला त्याने/तिने मृत्यूपत्राद्वारे किंवा अन्य मृत्यूपत्रीय व्यवस्थेद्वारे विल्हेवाट करण्याजोगी असेल अशा कोणत्याही संपत्तीची भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ चे उपबंध किंवा त्या त्या काळी अंमलात असलेला व हिंदूना लागू असलेला अन्य कोणत्याही विधी यानूसार तशी विल्हेवाट करता येईल.

हिंदू उत्तराधिकार अधिनियम, १९५६ लागू झाल्यानंतर खातेदार मृत्यू पावल्यास त्याच्या मालमत्तेचे उत्तराधिकारी ठरणारे त्याचे कायदेशीर वारसदार शोधून काढण्यासाठी, उपरोक्त वस्तूस्थिती विचारात घेण्यात यावी व त्यानंतर उत्तराधिकारासंबंधीचे आदेश देण्यात यावेत.

खातेदार मरण पावल्यावर, मयत खातेदाराच्या मालमत्तेचा उत्तराधिकार प्राप्त होणाऱ्या सर्व वारसांच्या नावाची (हिंदू उत्तराधिकार अधिनियम उपबंधान्वये) वारसाहक्क नोंदवहीत नोंद करावी लागेल. भू-संपत्ती सर्व वारसांमध्ये विभागण्यात आली असल्यास अशा सर्व वारसांची नांवे त्याच्या संबंधीत कब्जाप्रमाणे कब्जेदार म्हणून नोंदविण्यात यावीत. तथापि, भूसंपत्ती केवळ काही वारसांमध्येच विभागली असल्यास अशा सर्व वारसांची नावांची त्यांच्या कब्जाप्रमाणे नोंद करण्यात यावी. मयत खातेदराच्या वारसांची नावे (जमिनीचा कब्जा नसलेल्या परंतू मालमत्तेमध्ये अधिकार धारण करणाऱ्या) मालमत्तेमधील त्यांचा अधिकार व हितसंबंध दर्शविण्यासाठी, अधिकार अभिलेखाच्या ''कब्जेदार'' या स्तंभातच नोंदविण्यात यावीत. शक्यतो 'इतर अधिकार' स्तंभात नोंद करु नये. कारण कालांतराने 'इतर अधिकार' स्तंभातील नावे अनेक कारणांनी (अर्जामुळे, पुनर्लेखनात) कमी केली जातात आणि वारसा हक्कांना बाधा येते. हिंदू उत्तराधिकार अधिनियम, १९५६ मध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही तरतुदी, विखंडन प्रतिबंध व धारण जमिनीचे एकत्रिकरण संबंधीच्या अधिनियमाच्या किंवा कुळवहिवाट अधिनियमाच्या उपबंधांना कोणत्याही प्रकारे बाधक ठरत नाहीत.

☛ उपजत वेडा असणाऱ्या व्यक्तीला वाटपात हिस्सा मिळत नाही. परंतू त्याच्या मुलांना हिस्सा मिळु शकतो.

ഋ ❁ ഋ

**५.** **हिंदू उत्तराधिकार (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम-१९९४**

भारताच्या संविधानाने कायद्यापुढे समानता हे धोरण स्विकारल्यामुळे फक्त स्त्रित्वाच्या कारणामुळे सहदायकी मालकीतून कन्येला वगळणे हे संविधानाच्या विरुध्द आहे आणि महाराष्ट्रात महिला कल्याणाच्या इतर सर्व धोरणांत मिताक्षर कायद्याने नियंत्रीत करण्यात येत असलेल्या संयुक्त हिंदू कुटुंबातील सहदायकाच्या कन्येला सहदायकीचा हक्क प्रदान करण्याची तरतुद असल्यामुळे महाराष्ट्र शासनाने, दिनांक २२ जुन १९९४ रोजी हिंदू उत्तराधिकार अधिनियम १९५६, महाराष्ट्रात लागू करतांना त्यात सुधारणा करुन हिंदू उत्तराधिकार (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम १९९४ लागू केला.

✓ हिंदू उत्तराधिकार (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम १९९४ कलम २ अन्वये हिंदू उत्तराधिकार अधिनियम १९५६, महाराष्ट्रात लागू करतांना त्याच्या कलम २९ नंतर पुढे प्रकरण ३० समाविष्ट केले गेले.
✓ प्रकरण २-क अन्वये "उत्तरजीवीत्वाद्वारे उत्तराधिकार" नावाचे प्रकरण समाविष्ट केले गेले आणि पुढील तरतुदी समाविष्ट केल्या गेल्या.

✓ **कलम २९-क:** कलम ६ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी -
**(एक)** मिताक्षर कायद्याने नियंत्रीत केल्या जाणाऱ्या संयुक्त हिंदू कुटुंबामध्ये सहदायकाची कन्या, ज्या रीतीने पुत्र सहदायाद होतो, त्याच रीतीने जन्मापासून, तिच्या स्वत:च्या हक्कामुळे सहदायाद होईल आणि ती पुत्र असती तर तिला जे जे अधिकार, दायित्वे, नि:समर्थता प्राप्त झाली असती, ती प्राप्त होईल.
**(दोन)** उपरोक्त संयुक्त हिंदू कुटुंबामधील वाटणीच्या वेळेस पुत्राला वाटून देण्यात येत असलेल्या हिस्स्याइतका हिस्सा कन्येलाही मिळेल.
**(तीन)** उपरोक्त प्रमाणे हिस्सा मिळालेली स्त्री, त्या हिस्स्याबाबत मृत्यूपत्रद्वारे किंवा अन्य प्रकारे अशा मिळकतीची विल्हेवाट सुध्दा लावू शकेल.
**(चार)** उपरोक्त तरतुदी हिंदू उत्तराधिकार (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम-१९९४ च्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी (२२ जुन १९९४ पूर्वी) ज्या मुलींचे लग्न झाले आहे त्यांना लागू असणार नाही.
**(पाच)** दिनांक २२ जुन १९९४ पूर्वी ज्या वाटण्या घडून आल्या असतील त्यांना उपरोक्त तरतुदींमुळे बाधा येणार नाही.

## ६. हिंदू उत्तराधिकार (सुधारणा) अधिनियम- २००५ (महत्वाच्या तरतुदी)

केंद्र शासनाने हिंदू उत्तराधिकार (सुधारणा) अधिनियम-२००५ हा हिंदू उत्तराधिकार अधिनियम- १९५६ मध्ये सुधारणा करण्यासाठी दिनांक ९ सप्टेंबर २००५ रोजी अंमलात आणला. यानुसार हिंदू उत्तराधिकार अधिनियम- १९५६ च्या कलम ६ मध्ये सुधारणा करुन

✓ हिंदू उत्तराधिकार (सुधारणा) अधिनियम-२००५ कलम ६ (१) - मिताक्षर कायद्याने नियंत्रीत केल्या जाणाऱ्या संयुक्त हिंदू कुटुंबामध्ये सहदायकाची कन्या:

**(अ)** ज्या रीतीने पुत्र सहदायाद होतो, त्याच रीतीने जन्मापासून, तिच्या स्वत:च्या हक्कामुळे पुत्राप्रमाणेच सहदायाद होईल.

**(ब)** सहदायिकीतील मालमत्तेमध्ये तिला पुत्राप्रमाणेच सर्व अधिकार असतील.

**(क)** सहदायिकीतील मालमत्तेमध्ये कन्येलाही पुत्राप्रमाणेच सर्व अधिकार, दायित्वे, प्राप्त होतील.

तथापि, दिनांक २० डिसेंबर २००४ पूर्वी ज्या वाटण्या घडून आल्या असतील त्यांना उपरोक्त तरतुदींमुळे बाधा येणार नाही.

**(२)** उपरोक्त प्रमाणे हिस्सा मिळालेली स्त्री, त्या हिस्स्याबाबत मृत्यूपत्रद्वारे किंवा अन्य प्रकारे अशा मिळकतीची विल्हेवाट सुध्दा लावू शकेल.

उपरोक्त सन २००५ च्या सुधारणा कायद्यान्वये ९ सप्टेंबर २००५ पूर्वी जन्मलेल्या मुलींना तसेच दिनांक ९ सप्टेंबर २००५ रोजी हयात असलेल्या हिंदू अविभक्त कुटुंबातील मिळकतीत मुलाप्रमाणेच आणि मुलाइतकाच जन्मजात हक्क असेल अशी तरतुद केली होती.

मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १६/१०/२०१५ रोजी दिवाणी अपिल क्र. ७२१७/२०१३ (प्रकाश आणि इतर विरुध्द फुलवती आणि इतर) प्रकरणात निकाल देऊन *'वडिलोपार्जित हिंदू अविभक्त कुटुंबातील मिळकतीत मुलाप्रमाणेच आणि मुलाइतकाच जन्मजात हक्क मिळणारी मुलगी आणि त्या मिळकतीत हक्क असणारा सहदायक (कोपार्सनर) हे दोन्ही दिनांक ९ सप्टेंबर २००५ रोजी हयात असावेत, मग ती मुलगी कधीही जन्मली असो.'* असे म्हटले आहे.

उपरोक्त सन २००५ च्या सुधारणा कायद्याच्या कलम ४ अन्वये पूर्वीच्या कायद्यान्वये वारसाला, त्याच्या पूर्वजांनी (वडील, आजोबा, पणजोबा) घेतलेली कर्जे फेडण्याची जबाबदारी होती. याला 'पवित्र जबाबदारी (पायस ऑब्लिगेशन)' म्हटले जात होते. असे कर्ज वारसाने न फेडल्यास, असे कर्ज देणाऱ्यास न्यायालयात दाद मागता येत होती. केंद्र शासनाने सन २००५ च्या या सुधारीत कायद्यान्वये वारसाची, त्याच्या पूर्वजांनी (वडील, आजोबा, पणजोबा) घेतलेली कर्जे फेडण्याची जबाबदारी रद्द केली आहे व असे कर्ज देणाऱ्यास आता न्यायालयात दाद मागता येणार नाही अशी तरतुद केली आहे.

उपरोक्त सन २००५ च्या सुधारणा कायद्याच्या कलम ७ अन्वये वर्ग १ च्या वारसांच्या अनुसूचीमध्ये खालील चार वारस जोडले गेले आहेत.

(१) पूर्वमृत मुलीच्या पूर्वमृत मुलीचा मुलगा, (२) पूर्वमृत मुलीच्या पूर्वमृत मुलीची मुलगी,

(३) पूर्वमृत मुलाच्या पूर्वमृत मुलीची मुलगी, (४) पूर्वमृत मुलाच्या पूर्वमृत मुलीचा मुलगा.

◉ सन २००५ च्या हिंदू उत्तराधिकार (सुधारणा) कायदा- २००५ अन्वये हिंदू उत्तराधिकार (वारसा) अधिनियम-१९५६ मधील कलम ४(२), २३, २४ रद्द करण्यात आले आहेत.

## ७. महत्वाचे शब्दार्थ

* **वडिलार्जित मिळकत :** वडिलांकडून वारसाने आलेली मिळकत.

* **वाडिलोपार्जित मिळकत :** आजोबा किंवा पणजोबा यांच्याकडून वारसाने आलेली मिळकत. वडिलार्जित आणि वाडिलोपार्जित मिळकतीचे वाटप करता येते. एखादी व्यक्ती जर वडिलार्जित किंवा वाडिलोपार्जित मिळकत धारण करीत असेल तर त्याच्या मुलाच्या मुलाला आणि पणतूला त्या मिळकतींत जन्मत: किंवा दत्तक घेतल्यापासून, त्यातील हिस्यात हक्क प्राप्त होतो.

* **स्वकष्टाकर्जित मिळकत :** शिक्षणातून/नोकरीतुन, एकत्र कुटुंबाच्या मिळकतीचे सहाय्य न घेता, स्वत: कष्ट करुन मिळविलेली मिळकत. स्वकष्टाकर्जित मिळकत एकट्याच्या मालकीची असते. यामिळकतीचे, हयातीत, वारस हक्काने वाटप होत नाही. अशी मिळकत कमविणारी व्यक्ती अशा मिळकतीची स्वेच्छेने विल्हेवाट लावू शकते.

* **सख्खे नाते :** जेव्हा दोन व्यक्तींचा समान पूर्वज-पुरुषापासून, त्याच्या एकाच पत्नीच्याद्वारे वंशोद्भव झालेल्या व्यक्ती सख्ख्या नात्याने संबंधित असतात.

* **सापत्न नाते :** जेव्हा दोन व्यक्तींचा समान पूर्वज-पुरुषापासून, पण त्याच्याच निरनिराळ्या पत्नींच्याद्वारे वंशोद्भव झालेला असतो तेव्हा त्या सापत्न नात्याने संबंधित असतात.

* **सहोदर नाते :** जेव्हा दोन व्यक्तींचा समान पूर्वज-स्त्रीपासून, परंतू तिच्या निरनिराळ्या पतींच्याद्वारे वंशोद्भव झालेला असतो तेव्हा त्या सहोदर नात्याने संबंधित असतात. (पूर्वज-पुरुषात पित्याचा तर पूर्वज-स्त्रीत मातेचा समावेश होतो.)

* **अकृतमृत्यूपत्र व्यक्ती :** ज्या व्यक्तीने त्याच्या मालमत्तेची मृत्यूपत्रांन्वये व्यवस्था केली नसेल अशी व्यक्ती.

* **गोत्रज :** जर दोन व्यक्ती रक्ताच्या किंवा दत्तकाच्या नात्याने आणि संपूर्णपणे पुरुषांच्याद्वारे संबंधीत असल्यास एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीची गोत्रज असते.

* **भिन्न गोत्रज :** जर दोन व्यक्ती रक्ताच्या किंवा दत्तकाच्या नात्याने आणि संपूर्णपणे पुरुषांच्याद्वारे नव्हे अशा संबंधीत असल्यास एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीची भिन्न गोत्रज असते.

* **आळियसंतान कायदा :** जर हा अधिनियम पारित झाला नसता तर व्यक्ती या कायद्यातील उपबंधाबाबत ज्या रुढीप्राप्त 'मद्रास आळियसंतान अधिनियम १९४९' अन्वये नियंत्रीत झाल्या असता तो कायदा.

* **वारसदार :** या अधिनियमान्वये अकृतमृत्यूपत्र व्यक्तीच्या संपत्तीची उत्तराधिकारी होण्यास पात्र व्यक्ती.

**स्वतंत्र मिळकती :** खालील मिळकती या स्वतंत्र मिळकती म्हणून गणल्या जातात. यांना वाडवडिलार्जित मिळकती म्हणता येत नाही.

***(अ) अडथळ्यांनी मिळालेली :*** जी मिळकत, वडील, आजोबा, पणजोबा व्यतिरिक्त इतरांकडून प्राप्त झालेली आहे. अशी मिळकत एकत्र कुटुंबाची किंवा एकत्र कुटुंबाच्या वारसा हक्कानी मिळालेली नसते.

***(आ) देणगी :*** लहानशी जंगम मिळकत, वडीलांनी प्रेमापोटी आपल्या मुलाला भेट म्हणून दिलेली असते. ती मुलाची स्वतंत्र मिळकत होते.

***(इ) सरकारी अनुदान :*** शासनाकडून प्राप्त झालेली मिळकत स्वतंत्र मिळकत होते.

***(ई) एकत्र कुटुंबाची परत मिळविलेली मिळकत :*** एकत्र कुटुंबाची, वाडवडिलांनी गमावलेली मिळकत जर त्याच एकत्र कुटुंबातील सदस्याने, एकत्र कुटुंबाच्या मिळकतीचे सहाय्य न घेता परत मिळविली तर ती त्याची स्वतंत्र मिळकत होते.

***(उ) कमावलेली मिळकत :*** स्वत:च्या स्वतंत्र मिळकतीतुन संपत्ती मिळवून, त्यातून घेतलेली मिळकत ही स्वतंत्र मिळकत होते.

***(ऊ) वाटपातील हिस्सा :*** वाटपातील हिस्सा ही स्वतंत्र मिळकत होते.

***(ऋ) एकटा वारसदार :*** मागे एकटाच जिवंत राहिल्यामुळे, वारस म्हणून मिळालेली मिळकत ही स्वतंत्र मिळकत होते.

## ८. महत्वाचे न्याय निर्णय

✓ हिंदू विधवा स्त्रीला १९५६ नंतर तिच्या पतीच्या निधनानंतर मिळकत प्राप्त झाली तर ती त्या मिळकतीची संपूर्ण मालक बनते. व त्यानंतर त्या विधवेने लग्न केले तरीही तिला पती निधनानंतर मिळालेल्या मिळकतीवरील तिचा हक्क नष्ट  होत नाही. (ए.आय.आर. १९७१, मुंबई, ४१३)

✓ वडिलांनी वाटपात मिळालेल्या मिळकतीतून काही मिळकत खरेदी केल्यास ती मिळकत वडिलांच्या मालकीची होईल. त्या मिळकतीत त्यांचा मुलगा किंवा मुलगे सहदायाद (कोपार्सनर) नसतील. (ऑल महाराष्ट्र रिपोर्टर २००५ (३), ७८९)

✓ एकत्र कुटुंबामध्ये एखादी मिळकत खरेदी केली असेल, आणि त्या खरेदीसाठीची रक्कत एकत्र कुटुंबाची होती असे सिध्द करावयाचे असल्यास, अशी मिळकत खरेदी करण्याच्या वेळेस, एकत्र कुटुंबाकडे पुरेसा पैशाचा गाभा (न्युकलस) होता हे सिध्द  करावे लागेल. (ए.आय.आर. १९६५, एस.सी.,२८९)

✓ विधवेची शिलभ्रष्टता तिला वाटपास अपात्र ठरवित नाही. विधवा जरी शिलभ्रष्ट असली तरीही तिच्या नवऱ्याचा हिस्सा तिला द्यावा लागेल. (ए.आय.आर. १९७६, कलकत्ता, ३५६; ए.आय.आर. १९७८, कलकत्ता, ४३१)

✓ हिंदू मॅरेज ॲक्ट, कलम १६ अन्वये वडिलांच्या मिळकतीत अनौरस मुलांचा हिस्सा असतो. परंतू वडिलोपार्जित मिळकतीत अनौरस मुलांचा हिस्सा नसतो. तसेच दुसरी बायको असल्यास तिच्यापासून झालेली मुले वारस ठरतात. (ए.आय.आर. १९९६, एस.सी., १९६३; ए.आय.आर. १९८३, मुंबई, २२२)

✓ एकत्र कुटुंबाच्या मिळकतीमध्ये सर्व सभासदांचा एकत्र हक्क व एकत्र कब्जा असतो. प्रत्येक सहवारसदारास सामाईक कब्जा व मिळकतीचा उपभोग घेण्याचा समान हक्क असतो. केवळ एखाद्या सहवारसदाराचा प्रत्यक्ष कब्जा नाही म्हणून त्याचा हक्क संपत नाही. एकत्र कुटुंबाच्या मिळकतीमध्ये असणारा कब्जात जरी एकट्याचा असला तरीही असा कब्जा सर्वांचा मिळुन असतो. (ए.आय.आर. १९९५, एस.सी., ८९५)

✓ स्त्री-धनाची मिळकत ही त्या स्त्रिच्या संपूर्ण मालकीची असते. तिला त्याची वैयक्तिक इच्छेनुसार विल्हेवाट लावता येते. स्त्री-धन हिंदू एकत्र कुटुंबाच्या मिळकतीचा भाग नसतो. (ऑल महाराष्ट्र रिपोर्टर २०११ (६), ४२८ एस.सी.)

✓ बेकायदेशीरपणे केलेल्या दुसऱ्या लग्नातील पत्नीला मयत नवऱ्याच्या मिळकतीत हक्क किंवा हिस्सा मिळत नाही. (ए.आय.आर. २००२, गोहत्ती,९६)

## ९. एकत्र हिंदू कुटुंबातील मिळकतीचे वाटप

☞ **एकत्र कुटुंबाची मिळकत :** जरी मिळकत एकत्रीत असल्याबद्दलची धारणा असली तरी मिळकत एकत्र कुटुंबाची आहे हे शाबीत करावे लागते. एकत्र कुटुंबाची मिळकत ही एकत्र कुटुंबातील सर्व सदस्यांनी, एकत्र कुटुंबाच्यास पैशातून विकत घेतली आहे आणि त्या वेळेस एकत्र कुंटुंबामध्ये ती मिळकत खरेदी करण्याची आर्थिक क्षमता होती हे सिध्द करावे लागते.

☞ **भारतीय नोंदणी कायदा १९०८ कलम १७ :** रुपये शंभर पेक्षा कमी मूल्य असलेल्या मिळकतीचे वाटप तोंडी होऊ शकते. भारतीय नोंदणी कायदा १९०८ चे कलम १७ अन्वये रुपये शंभरपेक्षा जास्त मूल्य असलेल्या मिळकतीचे वाटप हे लेखी आणि नोंदणीकृतच असावे.

☞ **वाटप हस्तांतरण नाही :** मिळकतीचे वाटप करणे याचा अर्थ मिळकतीचे हस्तांतरण असा होत नाही. नव्याने मालकी आल्यास त्याला हस्तांतरण म्हटले जाते. एकत्र कुटुंबाच्या ज्या व्यक्तींमध्ये एकत्र कुटुंबाच्या मिळकतीचे असे वाटप केले जाते, त्या सर्वांचा त्या मिळकतीत सामाईक मालकी व सामाईक कब्जा असतो. अशी मिळकत मुळत: सर्वांच्याच मालकीची असते. अशी मालकी नव्याने येत नाही, त्यामुळे मिळकतीचे वाटप करणे याचा अर्थ मिळकतीचे हस्तांतरण असा होत नाही.
फक्त ७/१२ सदरी आणेवारी लागली म्हणजे वाटप झाले असे मानता येत नाही. फारतर तिला एक कौटुंबिक व्यवस्था मानण्यात येईल.

☞ **वाटपाचे प्रकार :** वाटपाचे चार प्रकार आहेत. (१) वडिलांनी स्वत:च स्वत:मध्ये आणि मुलांमध्ये मिळकतीचे एकसारखे वाटप करणे. (२) वाटपासंबंधी करार (३) दावा दाखल करुन किंवा लवादामार्फत मिळकतीचे वाटप करणे. (४) एखाद्या सहदायिकाने (कोपार्सनरने), तो मिळकतीतून तुटक झाला आहे असे जाहीर केल्यामुळे होणारे वाटप.

☞ **वाटपाचा दावा लावण्याचे हक्कदार :**
प्रौढ, सज्ञान सहहिस्सेदार, खरेदीदार, प्रत्येक सहदायक, विधवा, मयत मुलाची विधवा, अज्ञानाच्या हितासंबंधी दावा असल्यास, अज्ञान या सर्वांना वाटपासाठी दावा लावण्याचा हक्क आहे.
पत्नीला वाटपासाठी दावा लावता येत नाही परंतू वाटप जर तिच्या मुलामध्ये व नवऱ्यामध्ये झाले असेल तर तिला मुलाइतका हिस्सा प्राप्त होतो. (ए.आय.आर. १९७७, एस.सी., १९६४)

✓ हिंदू मॅरेज ॲक्ट, कलम १६ अन्वये लग्नापासून झालेल्या मुला-मुलींना वडिलांच्या मिळकतीत वारसा येतो व त्यांना दावा लावता येतो. परंतू सावत्र मुलाला, सावत्र वडिलांच्या मिळकतीत हक्क येत नाही.
✓ दत्तक घेतलेल्या मुला-मुलींना दत्तक आइ-वडिलांच्या संपत्तीत वारसाहक्क प्राप्त होतो.
✓ शारीरिक व मानसिक विकृती असलेल्या मुला-मुलींना वाटपात हिस्सा मिळतो.
✓ शिलभ्रष्ट आईला तिच्या मुलाच्या मिळकतीत हक्क प्राप्त होतो.
✓ घटस्फोट घेतलेल्या स्त्रीला तिने दुसरे लग्न केले असले तरीही मिळकतीत हक्क प्राप्त होतो.
✓ वाटपात जर एखादा सहहिस्सेदार वगळला गेला तर वाटपाचा हुकुमनामा शून्यनिय होतो. अशा प्रकरणात फेरवाटप करण्यात येते.

## १०. एकत्र कुटुंब मॅनेजरने एकत्र कुटुंबाची मिळकत विकणे

एकत्र कुटुंबाच्या मॅनेजरला एकत्र कुटुंबाच्या मिळकतीच्या फायद्यासाठी किंवा एकत्र कुटुंबाच्या गरजेसाठी एकत्र कुटुंबाची मिळकत विकण्याचा सशर्त अधिकार आहे. फक्त खाली दिलेल्या करणांसाठीच त्याला एकत्र कुटुंबाची मिळकत विकता येते अथवा गहाण ठेवता येते. या कारणांसाठी केलेले हस्तांतरण सहहिस्सेदारांवर बंधनकारक असते.

(१) सरकारी कर किंवा कुटुंबावर असलेले कर्ज फेडण्याससाठी

(२) सहहिस्सेदार किंवा कुंटुंबीयांच्या पोटपाण्यासाठी किंवा आजारपणासाठी

(३) सहहक्कदार किंवा सहहिस्सेदाराच्या किंवा त्यांच्या मुलीच्या लग्नाच्या खर्चासाठी

(४) जरुरीचे कौटुंबीक अंत्यविधी संस्कार, श्राध्द किंव कौटुंबीक समारंभ खर्चासाठी

(५) एकत्र कुटुंबासाठी मालमत्ता मिळविण्यासाठी किंवा ती टिकविण्यासाठी होणारा खर्च भागविण्यासाठी

(६) एकत्र कुटुंबाच्या कर्त्यावर किंवा इतर सभासदांवर गंभीर फौजदारी तोहमत झाली असेल तर त्यांच्या संरक्षणासाठी करावा लागणारा खर्च भागविण्यासाठी

(७) एकत्र कुटुंबाच्याण व्यलवसायासाठी काढलेल्या कर्जाची परतफेड करण्याौसाठी

(८) एकत्र कुटुंबाच्या इतर जरुरीच्या कारणांसाठी

उपरोक्त कायदेशीर गरजांसाठी संपूर्ण मिळकत विकण्याचा अधिकार फक्त कर्ता आणि वडिल यांनाच आहे. कायदेशीर गरज केवळ खरेदीपत्राच्या मजकुरावरुन सिध्द होत नाही. त्यासाठी इतर सुसंगत पुरावा द्यावा लागतो. असा व्यवहार जर उपरोक्त कायदेशीर गरजांसाठी होत नसेल तर सहवारसदार मनाई हुकुमाचा दावा दाखल करु शकतात.

***वडिलांचा विशेषाधिकार:*** एकत्र कुटुंबाची मिळकत किंवा ज्या मिळकतीत मुलांचा किंवा मुलांच्या मुलांचा हिस्सा आहे अशी एकत्र कुटुंबाची मिळकत विकण्याचा, गहाण देण्याचा विशेषाधिकार वडिलांना आहे. पूर्वीचे, नैतिक व कायदेशीर कारणासाठी घेतलेले कर्ज फेडण्यासाठीही अशी मिळकत विकण्याचा, गहाण देण्याचा विशेषाधिकार वडिलांना आहे.

## ११. मुस्लिम वारसा विषयक सर्वसाधारण नियम

मुस्लिम कायदा हा मुस्लिम धर्मियांचा व्यक्तिगत कायदा असून तो जगभरातील मुस्लिम धर्मियांसाठी लागू आहे. मुस्लिम कायद्याचे प्रमूळ उगम स्त्रोत चार आहेत. (१) कुराण, (२) सुन्ना, (३) इजमा, (४) कियास. याशिवाय इतिहसन, इतिलाह, रुढी, परंपरा, राष्ट्रीय कायदे ही दुय्यम उगम स्त्रोत आहेत.

मुस्लिम कायद्यान्वये मुस्लिम समाजात प्रामुख्याने दोन शाखा आहेत (१) शिया (२) सुन्नी.

मुस्लिम समाजात लग्न (निकाह), घटस्फोट (तलाक), मेहर (लग्नाआधी नवरदेवाने नवऱ्या मुलीला देण्याची रक्कम), बक्षीस पत्र (हिबा), मृत्यूपत्र (वसियतनामा), वारसा हक्क, पालनपोषण, अज्ञान पालकत्व, वक्फ आदी सर्व बाबी मुस्लिम कायद्यान्वये पार पाडल्या जातात. मुस्लिम व्यक्तीमार्फत न्यायालयात दाखल दाव्यातही मुस्लिम कायद्यान्वये प्रकरण चालवले जाते.

ब्रिटिश राजवटीत मुस्लिमांसाठी काही कायदे केले गेले. त्यातील शरियत ॲक्ट-१९३७ हा कायदा महत्वाचा आहे.

* **शरियत कायदा-१९३७:** हा कायदा ७ ऑक्टोबर १९३७ रोजी अंमलात आला. याला मुस्लिम धर्मियांचा व्यक्तिगत कायदा असे म्हटले आहे. या कायद्यातील कलम २ अन्वये, रुढी व परंपरा विरुध्द असली तरी शेत जमीन सोडून इतर अन्य बाबी जसे वारसा हक्क, स्त्रीची विशेष संपत्ती, निकाह, तलाक, उदरनिर्वाह, मेहर, पालकत्व, बक्षीस, न्यास, न्यासाची मालमत्ता, वक्फ या सर्व बाबी मुस्लिम व्यक्तिगत कायदान्वये ठरविल्या जातील.
त्यासाठी असलेल्या अटी म्हणजे (१) व्यक्ती मुसलमान असावी (२) भारतीय करार कायद्यातील कलम ११ अन्वये व्यक्ती करार करण्यास सक्षम असावी. (३) हा कायदा ज्या प्रदेशात लागू पडतो त्या प्रदेशातील रहिवासी असावी.

हिंदु उत्तराधिकार अधिनियम, १९५६च्या तरतुदी मुस्लिम धर्मियांना लागू होत नाहीत. त्यांच्या मिळकतीचे वारस मुस्लिम व्यक्तीगत (पर्सनल लॉ) कायद्यातील तरतुदीप्रमाणे ठरविले जातात.
मुस्लिमांच्या वैयक्तिक कायद्याप्रमाणे हनाफी सुन्नी आणि शिया अशा दोन्ही पंथांचे वारसाविषयीचे वेगवेगळे नियम आहेत.

मुस्लिम वारसा हक्क कायदा हा चार इस्लामिक कायद्यांचा संग्रह आहे.
(१) पवित्र कुराण
(२) सुन्नी (प्रेषिताला मानणारे)
(३) इज्मा (एका ठराविक मुद्द्यावर निर्णय घेतांना समाजातील सुशिक्षीत लोकांचा विचार घेणारे)
(४) क्विया (देवाने जे चांगले आणि योग्य ठरवून दिले आहे त्याच सुधारणा करणारे).

मुस्लिम व्यक्तीगत कायद्याप्रमाणे वारसाविषयक सर्वसाधारण नियम खालीलप्रमाणे आहेत.

* **वारस योग्य संपत्ती** : मृत मुस्लिम व्यक्तीचा अंत्यविधीचा खर्च आणि त्याचे कर्ज भागवल्यानंतर जे उरेल त्या संपदेचे वाटप/ विभागणी करण्यात येते.

⁕ **अमान्य संकल्पना :**

✓ इंग्रजी कायद्यात असलेला 'स्थावर संपत्ती' व 'जंगम संपत्ती' असा भेद मुस्लीम कायद्यात केला जात नाही.

✓ हिंदू कायद्यामध्ये असलेला 'वडिलोपार्जित संपत्ती' आणि 'स्वसंपादित संपत्ती' असा भेद मुस्लीम कायद्यात नसतो.

✓ मुस्लीम कायद्यात संयुक्त किंवा एकत्र कुटुंब ही संकल्पना नसते. मुस्लीम व्यक्तीची सर्व प्रकारची मालमत्ता त्याच्या एकट्याच्या मालकीची असते व तो मृत झाल्यावर तिच्या वारसदाराकडे त्यांच्या हिश्याप्रमाणे प्रक्रांत होते.

✓ मुस्लीम कायद्याला 'जन्मसिद्ध अधिकार' मान्य नाही. मुसलमान व्यक्तीचा वारसाधिकार पूर्वस्वामीच्या मृत्युनंतरच निर्माण होतो. पूर्वस्वामी जीवंत असतांना केवळ जन्मामुळे कोणालाही त्या पूर्वस्वामीच्या संपत्तीत काहीही हितसंबंध निर्माण होत नाहीत तसेच संभाव्य उत्तराधिकाराचे हस्तांतरण निरर्थक ठरते.

✓ मुस्लिम कायद्याला प्रतिनिधीत्वाचे तत्व मान्य नाही, मात्र याबाबतीत शिया आणि सुन्नी यांच्या नियमात फरक आहे. वारस मृत्यूच्यावेळी ठरतात.

⁕ **वारसाधिकार :** मुस्लिम कायद्यान्वये स्त्रियांना वारसाधिकार मिळतो. मात्र नात्याच्या दृष्टीने एकाच स्तरावरील स्त्री-पुरुषाला स्त्रीच्या दुप्पट हिस्सा मिळतो. अनौरस संततीला वडीलांचा हिस्सा मिळत नाही. पण आईचा मिळतो. मनुष्यवध करणाऱ्या व्यक्तीस वारसाधिकार मिळत नाही.

☞ **हनाफी (सुन्नी) वारसा नियम:**

वारसदारांचे सात वर्ग : हनाफी नियमानुसार वारसांचे सात वर्ग आहेत. त्यापैकी तीन वर्ग प्रमुख असून चार दुय्यम वर्ग आहेत.

✓ **तीन प्रमुख वर्ग:** (१) हिस्सेदार (२) अवशिष्टग्राही (३) दूरचे नातेवाईक.

या तीन प्रमुख वर्गामध्ये गोत्रज असोत किंवा भिन्नगोत्रज असे मृताचे सर्व रक्तसंबंधी समाविष्ट आहेत. त्यांच्याशिवाय नवरा किंवा बायको ही विवाहाने नातेवाईक झालेली व्यक्तीही येते. वरील तीन वर्गात कोणी वारस नसल्यास अपवाद म्हणून दुय्यम वारसदार उत्तराधिकारी होतात.

✓ **चार दुय्यम वर्ग:** (४) संविदानिर्मित उत्तराधिकारी (५) अभिस्वीकृत नातेवाईक (६) एकमेव उत्तरदानग्राही (७) वरील (४) ते (६) यांच्या अभावी सरकार.

☞ **<u>तीन प्रमुख वर्ग:</u>**

**(१) हिस्सेदार:** या वर्गामध्ये मृताचे काही निकटचे नातेवाईक येतात. त्यांना पवित्र कुरणान्वये विनिर्दिष्ट हिस्सा देण्यात आलेला आहे म्हणून त्यांना प्रमुख वारसदार म्हणतात. नवरा आणि बायको हे विवाहसंबंधाने झालेले नातेवाईक धरून हिस्सेदारांची संख्या बारा आहे.

या हिस्सेदारांपेक्षा अवशिष्टग्राही या दुसऱ्या वर्गातील वारसदारांचे स्थान अधिक किफायतशीर आहे. अवशिष्टग्राही अस्तित्वात असतील तर या हिस्सेदारांना त्यांच्या ठराविक हिश्यापलीकडे मृताच्या संपदेत काहीही मिळत नाही. एकाच वेळी अनेक हिस्सेदार अस्तित्वात असण्याचा संभव कमी असतो.

या एकूण बारा हिस्सेदारांपैकी आठ हिस्सेदार स्त्रिया आहेत. अनेकदा संपदेचा अधिकांश हिस्सा अवशिष्टग्राहींसाठी शिल्लक राहतो, त्यांच्यापैकी बहुतेक सर्व पुरुष आहेत. तेव्हा स्त्रियांची तरतुद व्हावी आणि त्यांना मृताच्या संपदेत काहीतरी वाटा मिळावा या उद्देशाने हिस्सेदारांच्या यादीत स्त्रीयांचा बहुसंख्येने अंतर्भाव केलेले आहे. उदाहरणार्थ- एक

मुसलमान व्यक्ती मृत झाल्यानंतर त्याच्या मागे एक विधवा आणि एक मुलगा असे वारसदार असले तर विधवा हिस्सेदार असल्यामुळे तिला १/८, आणि मुलगा अवशिष्टग्राही असल्यामुळे त्याला उर्वरित ७/८ हिस्सा मिळतो. विधवा हिस्सेदार नसती तर तिला काहीच मिळाले नसते.

**(२) अवशिष्टग्राही:** या वर्गात चार अपवाद सोडल्यास, फक्त गोत्रज पुरुष येतात. उदाहरणार्थ, बाप, बापाचा बाप, त्याचा बाप इत्यादी पुरुष पूर्वज, पुत्र, त्याचा पुत्र, त्याच्या पुत्राचा पुत्र असे स्वत:चे, बापाचे वगैरे पुरुष वंशज, कन्या आणि बहीण वगैरे. मयताची सर्व संपदा हिस्सेदारांचे हिस्से देण्यात संपली तर अवशिष्टग्राही या दुसऱ्या वर्गातील वारसदारांना काहीही मिळणार नाही. हिस्सेदार नसतील तर मृताची सर्व संपदा आणि ते असतील तर विनिर्दिष्ट हिस्सा वजा जाता उरलेली संपदा अवशिष्टग्राहींमध्ये विभागली जाते. हिस्सेदार अस्तित्वात असुन कोणीही अवशिष्टग्राही नसतील तर सर्व संपदा 'प्रत्यावर्तनाच्या तत्वाने' हिस्सेदाराकडे जाते.

**(३) दूरचे नातेवाईक:** जो हिस्सेदारही नाही आणि अवशिष्टग्राहीही नाही असा नातेवाईक म्हणजे दूरचा नातेवाईक होय. या वर्गात सर्व भिन्न गोत्रज आणि हिस्सेदारांच्या वर्गात येणाऱ्या स्त्रिया सोडून बाकीच्या गोत्रज स्त्रिया यांचा समावेश होतो. हिस्सेदार आणि अवशिष्टग्राही नसतील तरच संपदा दूरच्या नातेवाईकांकडे जाते.

☛ **<u>दुय्यम वर्ग (वारसदार):</u>** यांचे चार प्रकार आहेत. वर उल्लेखलेल्या तीन वर्गातील वारसदार नसतील तर मृताची संपदा दुय्यम वारसदारांकडे जाते. त्यापैकी वरच्या वर्गाचा वारसदार खालच्या वर्गाच्या वारसदाराला अपवर्जित करतो.

**(४) संविदानिर्मित वारसदार:** हनाफी कायद्यान्वये संविदेमुळेसुद्धा वारसाधिकार प्राप्त होत होते. मालकाकडून देय असलेला द्रव्यदंड किंवा खंडणी मालकाऐवजी तिऱ्हाईत इसमाने दिल्यास मालकाच्या मृत्यूनंतर तो तिऱ्हाईत इसम त्या संपदेचा मालक होईल अशी संविदा तिऱ्हाईत इसम आणि मालक यांच्यामध्ये झाली तर अशा संविदेखाली वारसाधिकार उत्पन्न होत असे. परंतू आता या प्रकाराला केवळ ऐतिहासिक महत्वच राहिले आहे.

**(५) अभिस्वीकृत नातेवाईक:** मुस्लिम व्यक्ती, त्याच्या मृत्यूपूर्वी, त्याच्या हयातीत कोणत्याही अज्ञात कुळातील व्यक्तीला आपला वारसदार म्हणून अभिस्वीकृत करू शकतो. त्याला अभिस्वीकृत नातेवाईक म्हणतात. पण ते नाते दुसऱ्यांच्याद्वारे असावे लागते, स्वत:च्याद्वारे असता कामा नये. तो ति-हाइताला भाऊ किंवा पुतण्या म्हणून, म्हणजे अनुक्रमे बापाचा मुलगा आणि चुलत्याचा मुलगा म्हणून अभिस्वीकृत करु शकतो, पण तो त्याला स्वत:चा मुलगा म्हणून अभिस्वीकृत करु शकत नाही. अशी अभिस्वीकृत व्यक्ती पाचव्या वर्गाची वारसदार होते.

**(६) एकमेव उत्तरदानग्राही:** वरच्या वर्गांपैकी कोणीही अस्तित्वात नसल्यास, मृत्युपत्रकर्ता आपली सर्व संपदा कोणाही व्यक्तीला मृत्यूपत्राने दान करू शकतो. अशा व्यक्तीला एकमेव उत्तरदानग्राही असे म्हणतात. मुस्लिम मृत्यूपत्रकर्ता व्यक्तीला जर वारसदार असतील तर आपल्या संपत्तीपैकी १/३ पेक्षा अधिक संपत्तीदानाचे मृत्यूपत्र तो करु शकत नाही. त्याला वारसदार नसतील तर तो आपली सर्व संपत्ती मृत्यूपत्राने देऊ शकतो.

**(७) सरकार:** मृत मुस्लिम व्यक्तीला कोणीही वारसदार किंवा उत्तरदानग्राही नसल्यास त्याची संपदा सरकार जमा होते. मूळ मुस्लिम विधीखाली अशा परिस्थितीत संपदा मुस्लिम समाजाच्या लाभासाठी सार्वजनिक खजिन्यात जमा होत असे.

☞ **मुस्लिम विधवा:** मुस्लिम धर्मात विधवेला वारस म्हणून डावलता येत नाही. आपत्यहीन विधवेलाही मयत नवऱ्याच्या मिळकतीत, अंत्यविधी, कर्ज आणि इतर कायदेशीर खर्च भागविल्यानंतर १/४ हिस्सा मिळतो. तथापि, आपत्ये किंवा नातवंडे असलेल्या विधवेला मयत नवऱ्याच्या मिळकतीत, अंत्यविधी, कर्ज आणि इतर कायदेशीर खर्च भागविल्यासनंतर १/८ हिस्सा मिळतो.

परंतू जर एखाद्या मुस्लिम व्यक्तीने आजारपणात त्याची सेवा करणाऱ्या एखाद्या स्त्रीशी लग्न करण्याचा विचार केला असेल परंतू धर्मानुसार लग्नाबाबतची परिपूर्तता करण्याआधी तो, त्या आजारपणात मयत झाला तर अशा स्त्रीला वारस म्हणून हिस्सा मिळत नाही. तथापि, अशा आजारी व्यक्तीने आजारपणात बायकोला घटस्फोट दिला आणि नंतर तो त्या आजारपणात मयत झाला तर त्याच्या बायकोला नवऱ्याच्या मिळकतीत वारस म्हणून हिस्सा मिळतो आणि तिचा हा वारसाधिकार, ती पुनर्विवाह करीत नाही तोपर्यंत चालू राहतो.

**व्याख्या:**

**(१) आजा आणि आजी:** आजा आणि आजी यांच्या व्याख्या वैशिष्ट्यपूर्ण आहेत, आपण नेहमी वडीलांच्या वडीलांना आजा म्हणतो आणि आईच्या वडीलांनाही आजा म्हणतो. परंतू प्राचीन अरब समाजात जाज्वल्य वंशाभिमान असल्याने ते दोन प्रकारच्या आजोबांमध्ये फरक करतात. 'आजा' ला अरब भाषेत 'जद्द' म्हणतात. अरब लोक वडीलांच्या वडीलांना 'जद्द सहीहू' म्हणतात. 'सहीह' म्हणजे ज्याला आपण मराठीत 'सहीसही' किंवा अगदी तंतोतंत म्हणतो असा अर्थ होतो.

आईच्या वडीलांना 'जद्द फासीद' असे म्हणतात. 'फासीद' म्हणजे अगदी तंतोतंत नसणारे किंवा ज्यात काहीतरी कमतरता आहे असे.

मुस्लिम विधीवर ग्रंथ लिहिणाऱ्यांनी 'सहीह' ला खरे आणि 'फासीद' ला खोटे असे शब्द वापरले आहेत. मुस्लिम कायद्याच्या बाबतीत आणखी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. ती म्हणजे पणजा, खापरपणजा किंवा निपणजा हे शब्द वरच्या पिढीतील पूर्वजांना आणि पणतू, खापरपणतू हे शब्द खालच्या पिढीतील वंशजांना न वापरता त्यांना अनुक्रमे आजा (कितीही वरचा म्हणजे वरच्या पिढीतील) आणि नातू (कितीही खालचा म्हणजे खालच्या पिढीतील) असेच म्हणतात. आजी आणि नातू यांच्या बाबतीत तशीच शब्दयोजना करतात.

**(२) सहीह आजा :** म्हणजे तो आजा आणि मृत यांच्या नात्यामध्ये एकही स्त्री दुवा असत नाही असा पूर्वज.

**(३) सहीह आजी** : म्हणजे ती आजी आणि मृत यांच्या नात्यामध्ये फासीद आजा बसत नाही अशी पूर्वज स्त्री.

**(४) फासीद आजा** : म्हणजे तो आजा आणि मृत यांच्या नात्यामध्ये एखादा तरी स्त्री दुवा असतो असा पूर्वज.

**(५) फासीद आजी** : म्हणजे ती आजी आणि मृत यांच्या नात्यामध्ये एखादा तरी फासीद आजा बसतो अशी पूर्वज स्त्री.

☞ **पुत्र**: हा प्रथम क्रमांकाचा अवशिष्टग्राही आहे. मुस्लिम विधीखाली हिस्सेदारांची अशा युक्तीने रचना केली आहे की, पुत्र हा केव्हाही अपवर्जित केला जाणार नाही परंतू पुत्र असल्यास काही वारसदार पुर्णपणे अपवर्जित होतात, काहींचे हिस्से घटतात आणि काही हिस्सेदार अवशिष्टग्राही होतात.

पुत्र असल्यास कन्या अवशिष्टग्राही होते आणि तिला पुत्राच्या अर्धा हिस्सा हिस्सा मिळतो.

☞ **वितरणाची आणि अपवर्जनाची तत्वे**

**नियम १:** हिस्सेदार आणि अवशिष्टग्राही या दोन वर्गातील कोणीही नातेवाईक नसतील तरच दूरच्या नातेवाईकांकडे वारसा जातो. मात्र हिस्सेदारांच्या यादीत पती आणि पत्नी असले तरी त्यांच्याबरोबर दूरचे नातेवाईक वारसदार होऊ शकतात.

**नियम २**: दूरच्या वारसदारांत, वंशज, पूर्वज, आणि सांपार्श्विक असे तीन गट आहेत. त्यांच्यापैकी वंशज पूर्वजांना अपवर्जित करतात, आणि पूर्वज सांपार्श्विकांना अपवर्जित करतात.

**नियम ३**: वंशजांमध्ये अग्रक्रम खालील दोन नियमांनी ठरविला जातो.

१) अधिक नजीकचा नातेवाईक अधिक दूरच्या नातेवाईकाला अपवर्जित करतो. कन्येचा पुत्र किंवा कन्येची कन्या यांना पुत्राच्या कन्येच्या कन्येपेक्षा वरचा क्रम मिळतो. कन्येचा पुत्र किंवा कन्येची कन्या हे सर्वात नजीकचे असे दूरचे नातेवाईक असल्यामुळे ते इतर सर्व दूरच्या नातेवाईकांना अपवर्जित करतात.

२)एकाच श्रेणीतील अनेक नातेवाईक असतील तर हिस्सेदार आणि अवशिष्टाग्राही यांच्या अपत्यांना दूरच्या नातेवाईकांच्या अपत्यापेक्षा वरचा क्रम मिळतो. उदाहरणार्थ, पुत्राच्या कन्येची कन्या आणि कन्येच्या कन्येचा पुत्र यांच्यामध्ये पुत्राच्या कन्येची कन्येला वरचा क्रम मिळतो. याचे कारण तिची आई म्हणजे पुत्राची कन्याही हिस्सेदार आहे, तर दुसऱ्याची आई असणारी कन्येची कन्या ही दूरची नातेवाईक आहे.

☞ **सावत्र अपत्ये** : सावत्र अपत्ये आणि सावत्र आईबाप हे एकमेकांचे वारसदार होत नाहीत.

☞ **अनौरस अपत्य:** विवाहबाह्य अपत्य हे फक्त त्याच्या आईचे अपत्य आहे असे मानण्यात येते. अपत्याला आईचा आणि आईकडूनच्या नातेवाईकांचा वारसा मिळतो आणि आई आणि तिचे नातेवाईक यांना अनौरस अपत्यांचा वारसा मिळतो. त्यात पिता आणि त्याचे नातेवाईक आणि अनौरस पुत्र यांच्यामध्ये परस्पर वारसाधिकार मिळत नाही. एका स्त्रीला औरस आणि अनौरस पुत्र असतील तर अनौरस पुत्र औरस पुत्राचा वारस होऊ शकत नाही असे अलाहाबाद उच्च न्यायालयाने म्हटले आहे.

एक सुन्नी स्त्री मयत झाली आणि तिचा पती आणि तिच्या बहिणीचा अनौरस पुत्र असे नातेवाईक तिच्या मागे असतील तर तिच्या पतीला हिस्सेदार या नात्याने औरस अपत्य नसल्यामुळे अर्धा हिस्सा मिळतो, आणि बहिणीच्या पुत्राला, तो अनौरस असला तरी, तो मृताच्या आईच्या द्वारा नातेवाईक झाल्यामुळे उरलेला अर्धा हिस्सा मिळतो.

☞ **पती-पत्नी:** हे दोघेही विवाहसंबंधामुळे हिस्सेदारांच्या यादीत आले आहेत. स्त्री मृत झाली आणि तिच्या मागे तिचा पती आणि अपत्ये किंवा कितीही खालच्या पुत्राची अपत्ये राहिली तर पतीला १/४ हिस्सा मिळतो आणि असे नसलेतर १/२ हिस्सा मिळतो. या उदाहरणात पती आणि पत्नी यांच्या जागांची उलटापालट केली तर पत्नीला अनुक्रमे १/८ किंवा १/४ हिस्सा मिळतो. पत्नी अनेक असल्यास त्यांच्यामध्ये १/८ किंवा १/४ हिस्सा समप्रमाणात विभागला जाईल.

बापाप्रमाणे आईलाही काही झाले तरी हिस्सा मिळतोच. पण दोन्ही बाजूच्या आज्या काही परिस्थितीत पूर्णपणे अपवर्जिल्या जातात. आई, अधिक नजीकची पैतृक किंवा मातृक आजी, बाप अधिक नजीकचा सहीह आजा यांच्यापैकी कोणीही असल्यास पैतृक आजी अपवर्जिली जाते. आई किंवा अधिक नजीकची पैतृक किंवा मातृक आजी असल्यास मातृक आजी अपवर्जिली जाते.

☛ **कन्या-** काहीही झाले तरी कन्या वारसदार होतेच. एकच कन्या असेल तर तिला १/२ हिस्सा मिळतो. पण दोन किंवा अधिक कन्या असल्यास त्यांना सर्वांना मिळून २/३ हिस्सा मिळतो. मृत व्यक्तीला पुत्र असल्यास कन्या अवशेषग्राही होते. पुत्राला तिच्या दुप्पट हिस्सा मिळतो.

☛ **बहीण-** बहीणीच्या अस्तित्वामुळे कन्या अपवर्जित होत नाही. मृताला एक कन्या आणि एक बहीण असल्यास कन्येला हिस्सेदार म्हणून तिचा १/२ हिस्सा व बहीणीला उत्तरदानग्राही म्हणून १/२ हिस्सा मिळतो. त्याचप्रमाणे दोन कन्या आणि दोन बहिणी असल्यास, दोन कन्यांना मिळून २/३ हिस्सा, हिस्सेदार म्हणून मिळतो.

☛ **पुत्राची कन्या-** पुत्र किंवा कन्या यांच्यापैकी कोणीही नसेल तर पुत्राच्या कन्येला १/२ हिस्सा, आणि पुत्राच्या दोनपेक्षा अधिक कन्या असतील तर त्यांना २/३ हिस्सा मिळतो. मात्र काही परिस्थितीत पुत्राच्या कन्येचा हिस्सा १/६ होतो आणि समान पुत्राचा पुत्र असल्यास ती अवशिष्टग्राही होते. पण पुत्राची कन्या आणि पुत्राची कन्येची कन्या असल्यास त्यांना मिळून २/३ हिस्सा मिळतो.

☛ **सहोदर भाऊ किंवा सहोदर बहिण-** हे प्राथमिक वारसदार नव्हेत. त्या दोघांनाही प्रत्येकी १/६ हिस्सा मिळतो. दोन सहोदर भाऊ किंवा सहोदर बहिणी असल्यास सहोदर भावाचा १/३ आणि सहोदर बहिणीचा १/३ हिस्सा असतो.
दोन सहोदर भावांमध्ये वारसाधिकार उत्पन्न होण्यासाठी ते दोघेही औरस असावे लागतात. एका स्त्रीला एक औरस आणि एक अनौरस असे दोन पुत्र झाले तर ते दोघे सहोदर भाऊ होत नाहीत आणि ते एकमेकांचे वारसदार होत नाहीत.

☛ पती, पत्नी, बाप, आई आणि कन्या हे प्राथमिक वारसदार असून ते कधीही संपूर्णत: अपवर्जित होत नाहीत. काही बाबतीत त्यांचा हिस्सा वाढतो  किंवा ते अवशिष्टग्राही होतात.

☛ हिस्सेदार किंवा अवशिष्टग्राही यांच्यापैकी कोणीही वारस असल्यास दूरचे वारसदार अपवर्जित होतात. याला अपवाद पती आणि पत्नी. ते असले आणि हिस्सेदार आणि अवशिष्टग्राही यांच्यापैकी दुसरे कोणीही वारस नसले तरी पतीपत्नीचे हिस्से वजा जाता बाकी संपदा दूरच्या वारसदारांकडे जाते.

☛ सर्वसाधारणपणे, नजीकचे वारसदार दूरच्या वारसांना अपवर्जित करतात.
कन्या ही पुत्राच्या कन्येच्या मानाने वरच्या श्रेणीतील, पण ती पुत्राच्या कन्येला संपूर्णपणे अपवर्जित करीत नाही. एकटी कन्या असल्यास ती पुत्राच्या कन्येचा हिस्सा १/२ च्या ऐवजी १/६ करते.

☛ **प्रत्यावर्तन:** सर्व हिस्सेदारांचे हिस्से दिल्यानंतर संपदेचा काही भाग शिल्लक राहिला आणि कोणीही अवशिष्टग्राही वारस नसेल तर तो उर्वरित भाग परत हिस्सेदारांकडे येतो आणि तो हिस्सेदारांमध्ये त्यांच्या त्यांच्या हिश्श्याप्रमाणे विभागला जातो. या परत येण्याच्या क्रियेला पारिभाषिक शब्दात 'प्रत्यावर्तन' म्हणतात. हिस्सेदारांच्या यादीतील अस्तित्वात असलेल्या सर्व हक्कदार वारसदारांचे ठराविक हिस्से दिल्यानंतर उर्वरित सर्व संपदा अवशिष्टग्राहींकडे येते. त्यांच्यापैकी एक व्यक्ती जरी असली तरी उर्वरित संपदा हिस्सेदारांकडे परत येत नाही. पण अवशिष्टग्राहींपैकी कोणीही नसेल तर तो उर्वरित भाग दूरच्या नातेवाईकांकडे न जाता परत हिस्सेदारांकडे येतो. याबाबतीत अपवाद पती आणि पत्नी. अवशिष्टग्राहींपैकी कोणीही नसेल आणि पती किंवा पत्नी हिस्सेदार असतील तर उर्वरित संपदा पती किंवा पत्नी यांच्याकडे परत न येता दूरच्या नातेवाईकांकडे जाते. पण अवशिष्टग्राही नसतील आणि दूरचे नातेवाईकही नसतील

आणि पती किंवा पत्नी किंवा दोघेही इतकेच वारसदार असतील तर मात्र संपदा त्यांच्याकडे, तिच्याकडे किंवा दोघांकडे परत येईल. अशावेळी संपदा सरकारजमा होत नाही.

☛ अवशिष्टग्राहींची खालीलप्रमाणे गटवारी केली आहे.
पुरुष: गट क्र. १- गोत्रज (स्वत:च्या अधिकारांत)
गट क्र. २- गोत्रज (चार नात्यातील स्त्रिया (दुसऱ्यांमुळे)
क) कन्या (पुत्राबरोबर)
ख) पुत्राची कन्या (कितीही वरील समान पुत्राच्या पुत्राबरोबर)
ग) सख्खी बहीण (सख्या भावाबरोबर)
घ) रक्तसंबंधी बहीणी (रक्तसंबंधी भावाबरोबर)

गोत्रज' या गटात, १)वंशज, २) पूर्वज, ३)बापाचे वंशज, आणि ४)पैतृक आजा (कितीही वरचा) याचे वंशज असे प्रकार केलेले आहेत. यापैकी (३) आणि (४) सांपर्श्विक आहेत.
गोत्रजांमध्ये अग्रक्रम ठरवताना एक गोष्ट लक्षात ठेवायची म्हणजे, वंशज पूर्वजांना अपवर्जित करतात आणि पूर्वज सांपार्श्विकांना. अपवर्जित सांपार्श्विकांमध्ये बापाचे वंशज आज्याच्या वंशजांना अपवर्जितात आणि अशा रीतीने अधिक जवळच्या आज्याचे वंशज अधिक दूरच्या आज्याच्या वंशजांना अपवर्जित करतात.

☛ **बक्षीस (हिबा):** मुस्लिम कायद्यान्वये बक्षिसाला 'हिबा' म्हणतात. जी मुस्लिम व्यक्ती वडिलोपार्जित स्थावर/जंगम मालमत्ता धारण करीत असेल ती व्यक्ती, इतर सहधारकांची 'हिबा' साठी संमती नसली तरीही त्याची स्थावर/जंगम मिळकत 'हिबा' म्हणून देऊ शकेल.
रक्तसंबंधी नात्यामध्ये केलेल्या तोंडी 'हिबानामा' होऊ शकतो.
'हिबानामा' साठी आवश्यक असलेल्या अटी म्हणजे (१) 'हिबा' देणाऱ्याची इच्छा व त्याचे प्रकटीकरण (२) ज्याला 'हिबा' द्यावयाचा आहे त्याची अथवा त्याच्या वतीने दुसऱ्याची संमती. (3) जी मालमत्ता 'हिबा' द्यावयाची आहे त्या मालमत्तेचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष ताबा दिला पाहिजे. यापैकी एकही गोष्ट घडली नाही तर 'हिबा' व्यवहार अवैध ठरतो.

## १२. शियापंथीय संप्रदायाच्या विधीखालील वारसा

☞ **शिया विधिज्ञ वारसदारांचे दोन गट करतात:**

**१)** रक्तसंबंधी म्हणजे रक्तसंबंधामुळे झालेले वारसदार. यांच्यामध्ये गोत्रज आणि भिन्न गोत्रज यांचा समावेश होतो.

**२)** विशेष बाह्य कारणामुळे झालेले वारसदार. या गटात विवाहामुळे झालेले नातेवाईक म्हणजे पती/ पत्नी यांचा समावेश होतो.

☞ **रक्तसंबंधी वारसदारांचे वर्ग:**

**(१)** रक्तसंबंधी वारसदाराचे तीन वर्ग असून प्रत्येक वर्गात दोन विभाग आहेत:

✓ वर्ग- १- विभाग (१) आईवडील; विभाग (२) अपत्ये आणि सरळ रेषेतील वंशज (कितीही खालचे).

✓ वर्ग २- विभाग (१) आजा आजी (कितीही वरचे) विभाग (२) भाऊ आणि बहिणी आणि त्यांचे वंशज (कितीही खालचे)

✓ वर्ग ३- विभाग (१) चुलते आणि आत्या, आणि मृताच्या आईबापाचे आणि कितीही वरच्या आजाआजींचे चुलतेआणि आत्या आणि त्यांचे कितही खालचे वंशज. विभाग (२) मामा आणि मावशा, आणि मृताच्या आईबापाचे आणि कितीही वरच्या आजाआजींचे मामा आणि मावशा आणि त्यांचे कितीही खालचे वंशज.

वरील तीन वर्गांपैकी पहिला वर्ग दुसऱ्या वर्गाला आणि दुसरा वर्ग तिसऱ्या वर्गाला अपवर्जित करतो. प्रत्येक वर्गाच्या दोन विभागांत एक विभाग दुसऱ्या विभागाला अपवर्जित करीत नाही. दोन्ही विभागांना मिळून वारसा मिळतो. पण प्रत्येक विभागात अधिक नजीकच्या श्रेणीतील वारसदार अधिक दूरच्या श्रेणीतील वारसदारांना अपवर्जित करतात.

♣ हनाफी विधीखाली हिस्सेदार आणि अवशिष्टग्राही दूरच्या नातेवाईकांना अपवर्जितात,

▲ शिया विधीखाली ते सर्व सहवारसदार आहेत.

♣ हनाफी विधीप्रमाणे भिन्न गोत्रजांपेक्षा गोत्रजांना अग्रक्रम मिळतो,

▲ शियाविधीखाली गोत्रज आणि भिन्न गोत्रज हा फरकच नाही. शियापंथीय विधीखाली सर्वात नजीकच्या नातेवाईकाला अग्रक्रम मिळतो.

♣ शिया विधीमध्ये हिस्से निश्चित करण्यासाठी फक्त दोन वर्ग करतात. एक हिस्सेदारांचा आणि दुसरा अवशिष्टग्रहींचा.

▲ हनाफी विधीखाली दूरचे नातेवाईक हा आणखी एक वर्ग आहे, तो शिया विधीखाली नाही.

☞ **हिस्सेदार:** शिया विधिज्ञ वारसदारांचे नऊ हिस्सेदार असल्याचे मानतात.

१ आणि २: नवरा आणि बायको: हे विवाहसंबंधामुळे वारसदार झाले आहेत.

३, ४ आणि ५: बाप, आई आणि कन्या: हे रक्तसंबंधामुळे झालेल्या वारसदारांपैकी पहिल्या विभागातील आहेत.

६, ७, ८ आणि ९: सहोदर भाऊ, सहोदर बहीण, सख्खी बहीण आणि रक्तसंबंधी बहीण. हे दुसऱ्या वर्गातील दुसऱ्या विभागाचे आहेत.

☞ **हिस्सेदारांचे वंशज:** शिया विधिज्ञ हिस्सेदारांचे वंशज हिस्सेदार होतात असे मानतात तथापि, तो नियम १) कन्या, २) सहोदर भाऊ, ३) सहोदर बहीण, ४) सख्खी बहीण, आणि ५) रक्तसंबंधी बहीण या पाच हिस्सेदारांपुरताच लागू होते.

बाकी चौघांचे बाबतीत (पती, पत्नी आणि आई) यांच्या बाबतीत लागू होत नाही. या चौघांचे वंशज हिस्सेदार होत नाहीत.

☞ **शाखावार वितरण:** शिया विधीखाली वारसदारांच्या तीन वर्गांपैकी प्रत्येक वर्गात प्रतिशाखा वितरण केले जाते. व्यक्तिवार नाही.

याचा अर्थ असा की, मृताला एकापेक्षा अधिक पुत्र असतील आणि त्या पुत्रांनाही पुत्र असतील तर सर्व नातवांना सारखे हिस्से न देता नातू ज्यांच्याद्वारे वारस झाले ते म्हणजे मृताचे पुत्र जिवंत आहेत असे कल्पून त्याचे हिस्से ठरवायचे आणि मग त्या पुत्राचे हिस्से त्यांच्या त्यांच्या पुत्रांमध्ये विभागायचे.

**काही संकीर्ण तरतुदी**:

**१) सरकारजमा** : नातेवाईक वारसदारांपैकी कोणीही जिवंत नसल्यास, मृताची संपदा सरकारजमा होते.

**२) अनौरस अपत्य**: अनौरस अपत्यांना वारसाधिकार आहे किंवा कसे याबद्दल मतभेद आहे. एक मत असे आहे की अनौरस अपत्ये फक्त आईचे वारसदार होतात, त्यांना बापाचा वारसा मिळत नाही. दुसरे मत असे की व्याभिचारातून जन्माला आलेल्या अपत्यांना आईचासुद्धा वारसा मिळत नाही बापाचा तर नाहीच नाही.

मुल्लांच्या मते या बाबतीत विधी असा आहे की, अनौरस अपत्याला आईचासुद्धा वारसा मिळत नाही आणि आई किंवा तिचे नातेवाईक यांना अनौरस अपत्यांचा वारसा मिळत नाही.

**३) दोन किंवा अधिक नाती**: एखादी व्यक्ती दोन नात्यांमुळे मृताची वासरदार असेल तर त्या व्यक्तीला दोन्ही नात्यांनी वारसाधिकार मिळतो. एका स्त्रीने आपल्या चुलत भावाशी विवाह केला. पुढे ती मयत झाली. तिच्या पतीला पती म्हणून एक आणि चुलत भाऊ म्हणून एक असा दुहेरी हिस्सा मिळतो.

**४) मनुष्यवध**: एखाद्या मनुष्याने मृताचा वध उद्देशपूर्वक केला असेल तरच त्याचा वारसाधिकार शिया विधीखाली नष्ट होतो.

* **वक्फ अधिनियम १९५५**: इस्लाम धर्माच्या धार्मिक कामाकरिता वापरण्यात येणाऱ्या सर्व मिळकती (मशिद, इदगाह, दर्गा, मकबरा, कब्रस्तान, धार्मिक उपासना संस्था) वक्फ कायद्याखाली येतात.

धार्मिक किंवा धर्मदाय संस्थेमध्ये सहभागी होण्याचा अधिकार असलेली कोणत्याही व्यक्तीचा समावेश वक्फमध्ये स्वारस्य असणारी व्यक्ती म्हणून होतो. केंद्र शासनाने १ जानेवारी १९९६ पासून वक्फ अधिनियम १९९५ चा अंमल सुरु केला आहे. वक्फ अधिनियम १९९५, कलम ५६ अन्वये वक्फ मंडळाच्या परवानगीशिवाय वक्फची मालमत्ता भाडेपट्ट्याने देता येणार नाही. सात-बारा उताऱ्यावर वक्फ मालमत्तेसंबंधी कोणत्याही व्यवहाराबाबत महाराष्ट्र वक्फ मंडळाचा ना हरकत दाखला आवश्यक आहे.

## १३. भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ मधील पारसी धर्मियांसाठी वारसाचे नियम

भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ मधील प्रकरण तीन, कलम ५० ते ५६ मध्ये मृत्युपत्र न करता मृत झालेल्या पारसी धर्मीय व्यक्तीचे वारसाहक्क नियमांबाबत तरतुद आहे.

**कलम ५० :** मृत्यूपत्र न करता मयत झालेल्या व्यक्तीच्या वारसाबाबत सर्वसाधारण नियम असे आहेत-

**अ)** पारसी धर्मात, मृत व्यक्तीच्या हयातीत जन्मलेले अपत्य व मृत्यूसमयी पत्नीच्या गर्भात असणारे परंतू त्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर जिवंत जन्मलेले अपत्य असा भेद केला जात नाही.

**ब)** पारसी धर्मात, मृत व्यक्तीचे जे मयत अपत्य कोणतेही वारस न मागे ठेवता मयत झाले आहेत अशांचा मिळकतीचे हिस्से पाडताना विचार केला जात नाही.

**क)** पारसी धर्मात, जेव्हा व्यक्तीच्या मयत वारसाची विधवा, मयत व्यक्तीच्या हयातीत, पुनर्विववाह करते तेव्हा तिला वारसा हक्क मिळत नाही.

**कलम ५१ :** १) उपकलम २ मधील तरतुदीस अधीन राहून मृत पारसी पुरुषांच्या मिळकतीची विभागणी खालीलप्रमाणे होईल :

**अ)** पारसी वारसा कायद्यान्वये, जेव्हा मयत पारशी पुरुषामागे त्याची विधवा पत्नी व मुले आणि मुली असतात तेव्हा प्रत्येक मुलगा आणि विधवा पत्नी यांना प्रत्येक मुलीच्या दुप्पट हिस्सा मिळेल.

अथवा

**ब)** जेव्हा मयत पारशी पुरुषामागे विधवा पत्नी नाही पण फक्त मुले आणि मुली आहेत अशावेळी प्रत्येक मुलाला प्रत्येक मुलीच्या दुप्पट हिस्सा मिळेल. अशा पद्धतीने मिळकतीचे विभाजन केले जाईल.

पारसी धर्मात ‘मुलगा’ आणि ‘मुलगी’ या संज्ञेत सावत्र किंवा दत्तक मुलगा किंवा मुलगी यांचा समावेश होत नाही. परंतू या संज्ञेत मयत मुलगा किंवा मुलगी यांचा समावेश असू शकतो.

पारसी धर्मानुसार सावत्र मुलगा किंवा मुलगी म्हणजे त्या माता किंवा पित्याचे पूर्वी झालेल्या लग्नापासून झालेले आपत्य. अशा आपत्याला सावत्र माता किंवा सावत्र पित्याच्या मिळकतीत वारसा हक्क मिळत नाही.

दत्तकाबाबतही पारसी धर्मात काटेकोर नियम नाहीत. पारसी धर्मात अंत्यविधी करण्यासाठी दत्तक घेतले जाते. पारसी धर्मात दत्तक आपत्याला ‘पलुक पुत्र’ किंवा ‘धर्मपुत्र’ म्हणतात. ‘पलुक पुत्राची’ नेमणूक, पारसी व्यक्ती हयात असतांना केली जाते तर ‘धर्मपुत्राची’ नेमणूक पारसी व्यक्ती मयत झाल्यानंतर अंत्यविधी कार्य करण्यासाठी केली जाते.
दत्तक आपत्याला दत्तक घेणाऱ्या माता किंवा पित्याच्या मिळकतीत वारसा हक्क मिळत नाही. मृत्यूपत्रानुसार दत्तक आपत्याला काही मिळकत दिली जाऊ शकते.

२) जेव्हा मृत पारसी पुरुषामागे त्याची आई व वडील किंवा दोघेही जिवंत असतील, शिवाय मुले, मुली किंवा विधवा पत्नी व मुले, मुली असे वारस असतात तेव्हा वरील नियमाप्रमाणे मिळकतीचे हिस्से पडतात. मात्र वडील जिवंत असल्यास त्यांना मृताच्या मुलास मिळणाऱ्या हिश्याचा अर्धा भाग व आई जिवंत असल्यास तिला मृताच्या मुलाला मिळणाऱ्या हिश्याचा अर्धा भाग इतका हिस्सा मिळेल असे मिळकतीचे विभाजन केले जाईल.

**कलम ५२ :** जेव्हा पारसी स्त्री मृत्यूपत्र न करता मृत होते तेव्हा तिच्या मिळकतीचे वारस खालीलप्रमाणे ठरविले जातात:

**अ)** जेव्हा मृत पारसी स्त्रिच्यामागे तिचे पती व मुले, मुली राहतात तेव्हा त्या सर्वांना समान हिश्याने तिची मिळकत मिळते.

**ब)** जेव्हा मृत पारसी स्त्रिच्यामागे पती नसतात व फक्त मुले आणि मुली असतात तेव्हा त्या प्रत्येकाला मयत स्त्रिच्या मिळकतीत समान हिस्सा मिळतो.

**कलम ५३ :** जेव्हा पारसी व्यक्ती, मागे अपत्ये ठेवून मयत होते आणि एखादे अपत्य मयत असल्यास असे मयत आपत्य जर जिवंत असते तर त्याला मयताच्या मिळकतीचा मिळाला असता अशा हिश्याचे वाटप त्या मयत आपत्याच्या वारसांमध्ये होते.

**अ)** जर पूर्वमृत अपत्य असेल तर त्याची विधवा पत्नी व मुले, मुली यापूर्वी चर्चीलेल्या नियमाप्रमाणे त्याच्या मिळकतीत हिस्से घेतील. मात्र जर पूर्वमृत मुलामागे त्याची विधवा व त्याच्या मुलाची विधवा यांच्याशिवाय कुणी अपत्य अगर अपत्यजन्य वारस नसेल तर त्याला मिळालेला हिस्सा पूर्वमृत व्यक्तीचा हिस्सा न समजता तो पारसी व्यक्तीच्या मिळकतीचा भाग समजून यापूर्वी चर्चीलेल्या नियमाप्रमाणे विभागला जाईल. म्हणजे पारसी व्यक्तीच्या मिळकतीचे विभाजन करताना पूर्वमृत मुलांचा विचार केला जाणार नाही.

**ब)** जर मृत पारसी व्यक्तीचे पूर्वमृत अपत्य मुलगी असेल तर तिच्या हिश्याची मिळकत तिच्या मुलामुलींमध्ये समानपद्धतीने विभागली जाईल.

**क)** जर मृत पारसी व्यक्तीच्या हयातीत त्याच्या पूर्वमृत मुलाच्या मुलाचा अथवा पूर्वमृत मुलाच्या मुलीचा मृत्यू झाला असेल तर त्यांचा हिस्सा वरील 'अ' आणि 'ब' मधील तरतुदीप्रमाणे त्यांच्या वारसांकडे संक्रमीत होईल.

**ड)** जर मृत पारसी व्यक्तीला जवळचे कुणी वारस नसतील तसेच वंशावळीतील अगदी दूरचा वारसही मयत असेल तेव्हा त्याच्या वारसाला हिस्से देताना वरील 'क' मधील तरतूद लागू पडेल.

**कलम ५४ :** जर मृत पारसी व्यक्तीच्या मागे फक्त त्याची विधवा पत्नी अगर तिचा विधूर पती अगर एखाद्या अपत्याची विधवा असे वारस असतील तेव्हा अशा व्यक्तीच्या मिळकतीचे विभाजन खालील नियमाप्रमाणे केले जाते.

**अ)** जर मृत पारसी व्यक्तीमागे फक्त त्याची विधवा अथवा विधूर हेच वारस असतील तेव्हा अशा वारसांना मृत व्यक्तीच्या मिळकतीतील अर्धा हिस्सा मिळतो.

**ब)** जेव्हा मृत पारसी व्यक्तीमागे त्याची विधवा किंवा विधूर याशिवाय त्यांच्या अपत्याची विधवाही वारस असेल तर प्रथम मृत व्यक्तीच्या विधवा अथवा विधूरास मिळकतीतील १/३ (एक त्रित्यांश) हिस्सा मिळेल. नंतर तिच्या पूर्वमृत अपत्याच्या विधवेला त्या मिळकतीतील १/३ (एक त्रित्यांश) हिस्सा दिला जाईल. (पूर्वमृत अपत्याच्या विधवा एकापेक्षा जास्त असतील तर त्यांचा १/३ हिस्सा त्यांच्यामध्ये समान प्रमाणात विभागून दिला जाईल.)

**क)** जेव्हा मृत पारसी व्यक्तीमागे फक्त त्याच्या पूर्वमृत अपत्याची विधवाच वारस असते तेव्हा तिला त्याच्या मिळकतीतील २/३ भाग समान प्रमाणात विभागला जाईल.

**ड)** वरील अ, ब, किंवा क प्रमाणे मृत पारसी व्यक्तीच्या मिळकतीचे वाटप केल्यानंतर शिल्लक राहणाऱ्या मिळकतीचे विभाजन मृत व्यक्तीच्या परिशिष्ट दोन मधील भाग १ च्या नातेवाईकांमध्ये त्यांच्या क्रमानुसार केले जाते, असे विभाजन करताना एकाच पिढीतील पुरुषांना त्याच पिढीतील स्त्री वारसापेक्षा दुप्पट हिस्सा मिळतो.

## परिशिष्ट - दोन

### *भाग एक (कलम ५४)*

१. वडील आणि आई
२. भाऊ आणि बहिणी (दुध भाऊ-बहिणी वगळून) तसेच पूर्वमृत भाऊ बहिणीची मुले-मुली.
३. वडीलांचे वडील (आजोबा) आणि वडीलांची आई (आजी)
४. वडीलांच्या वडीलाचे वडील (पजोबा) वडीलांच्या आईची आई (पणजी)
५. पणजोबाची मुले-मुली आणि ते पूर्वमृत असल्यास त्यांची मुले-मुली.

**इ)** जर शिल्लक राहिलेल्या मिळकतीसाठी पात्र ठरविलेले वारस उपलब्ध नसतील तर ती मिळकत या कलमामधील तरतुदीनुसार पात्र ठरविलेल्या वारसांना मिळते.

**कलम ५५ :** जेव्हा मृत पारसी व्यक्तीमागे त्याची विधवा, विधूर, अपत्य, अपत्याचे अपत्य अगर अपत्याची विधवा यांपैकी कोणीही वारस उपलब्ध नसेल तर अशा मृत व्यक्तीची मिळकत परिशिष्ट दोन मधील भाग- दोन मध्ये उल्लेखिलेल्या नातेवाईकांना त्यांच्या परिशिष्टातील क्रमाने मिळते आणि त्यामधील प्रत्येक पुरुष वारसाला स्त्री वारसाच्या दुप्पट हिस्सा मिळतो.

### *भाग दोन (कलम - ५५)*

१. वडील आणि आई
२. भाऊ आणि बहिणी (दुध भावंडे वगळून) तसेच पूर्वमृत भावंडांची मुले.
३. वडील आजोबा आणि आजी.
४. वडील आजोबांची मुले-मुली आणि जे पूर्वमृत असतील त्यांची मुले-मुली.
५. वडील पणजोबा आणि पणजी
६. पणजोबांची मुले-मुली आणि जे पूर्वमृत असतील त्यांची मुले-मुली.
७. दुध भावंडे आणि त्यांच्यापैकी पूर्वमृत असतील त्यांची मुले-मुली.
८. आई आजोबा आणि आई आजी
९. आई आजोबांची मुले-मुली आणि त्यांच्यापैकी जे पूर्वमृत असतील त्यांची मुले-मुली.
१०. भावांच्या आणि अर्धरक्त भावांच्या विधवा.
११. वडील आजोबांच्या मुलाची विधवा पत्नी.
१२. आई आजोबांच्या मुलाची विधवा पत्नी.
१३. मृत व्यक्तीच्या हयातीत पुनर्विवाह न केलेले मृत व्यक्तीच्या पूर्वमृत मुलीचे विधूर पती.
१४. आईच्या आजोबाचे वडील आणि आई. (आई पणजोबा-पणजी)
१५. आई पणजोबांची मुले-मुली आणि त्यांच्यापैकी जे पूर्वमृत असतील त्यांची मुले-मुली.
१६. आई आजीची मुले-मुली आणि त्यांच्यापैकी जे पूर्वमृत असतील त्यांची मुले-मुली.
१७. वडील आजीचे आई वडील.
१८. वडील आजीचे वडीलांची मुले-मुली आणि त्यांच्यापैकी जी पूर्वमृत असतील त्यांची मुले-मुली.

**कलम ५६ :** जेव्हा वरील तरतुदींप्रमाणे मृत पारसी व्यक्तीच्या मिळकतीस पात्र ठरविलेले वारस नसतात तेव्हा ते मिळकत मृत व्यक्तीच्या नात्यातील जवळच्या व्यक्तीमध्ये समप्रमाणात विभागली जाते.

## १४. हिंदू धर्मिय व्यक्तीच्या मृत्यूपत्राबातच्या तरतुदी

भारतात मृत्यूपत्र कसे असावे किंवा मृत्यूपत्राने वारसा कसा प्राप्त होतो यासंबंधी भारतीय वारसा कायदा, १९२५ मध्ये चर्चा केलेली आहे.

☞ **मृत्यूपत्र:** एखाद्या व्यक्तीने, त्याच्या मृत्यूनंतर, त्याच्या मालकीच्या संपत्तीचे वाटप कसे व्हावे याबाबत घोषित केलेली इच्छा म्हणजे मृत्यूपत्र.

☞ **कायदेशीर तरतूद:** भारतीय वारसा कायदा, १९२५, कलम- २ (एच) अन्वये मृत्यूपत्राची व्याख्या दिली आहे. आणि याच कायद्याच्या भाग ६ मध्ये कलम ५७ पासून मृत्यूपत्राबाबत तरतुदी दिलेल्या आहेत.
भारतीय वारसा कायदा, १९२५, कलम ५७ म्हणजे हिंदू विल्स ॲक्ट, १८७० च्या कलम २ ची पुनरावृत्ती आहे.

भारतीय वारसा कायदा, १९२५ भारतातील सर्वधर्मियांना म्हणजे हिंदु, ख्रिश्चन, पारशी, अँग्लो इंडियन्स इ. यांना लागू होतो. हिंदू या संज्ञेमध्ये बौद्ध, शिख, जैन, ब्राम्होसमाजी, आर्यसमाजी, नंबुद्री, लिंगायत यांचाही समावेश होतो व या सर्वांना हा कायदा अंशत: लागू पडतो. मुस्लिम धर्मिय लोकांना हा कायदा पूर्णपणे लागू पडत नसला तरी प्रोबेट, लेटर्स ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन इ. साठी लागू आहे. जेथे व्यक्तीगत कायद्यानुसार वारसासंबंधी प्रश्न निर्माण होत नाहीत तेथे मृत्यूपत्रासाठी भारतीय वारसा कायदा १९२५ च्या तरतुदी लागू होतात.

मृत्यूपत्र न करता मरण पावलेल्या विविध धर्माच्या व्यक्तींच्या मिळकतीचे वारस कसे ठरविले जातात या विषयीच्या तरतुदी या कायद्यात दिलेल्या आहेत.

भारतीय वारसा कायदा, १९२५, कलम- २ (ह) अन्वये मृत्यूपत्र-इच्छापत्राची व्याख्या खालीलप्रमाणे दिलेली आहे.
*" मृत्यूपत्र म्हणजे मृत्यूपत्र करणाऱ्याने त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या सर्व प्रकारच्या मालमत्तेची विल्हेवाट कशी लावावी यासंबंधीची कायदेशीर रितीने घोषित केलेली इच्छा होय."*

☞ **मृत्यूपत्राचे प्रकार:**

**(१) संयुक्त मृत्यूपत्र (Joint Will):** जेव्हा एकापेक्षा जास्त व्यक्ती, एकाच लेखाने, त्यांच्या मृत्यूनंतर, त्यांच्या संपत्तीची विल्हेवाट कशी लावावी याबाबत लेख करतात त्याला संयुक्त मृत्यूपत्र म्हणतात. या व्यक्तींपैकी ज्याचा मृत्यू होईल, त्या व्यक्तीच्या संपत्तीबद्दल मृत्यूपत्रातील भाग प्रभावित होईल.

**(२) पारस्परिक मृत्यूपत्र (Mutual Will):** जेव्हा दोन व्यक्ती, एकाचा मृत्यू झाल्यावर दुसऱ्याला त्याची संपत्ती मिळेल या आशयाचा लेख करतात त्याला पारस्परिक मृत्यूपत्र म्हणतात.

**(३) स्वलिखित मृत्यूपत्र (Holographic Will):** पूर्णत: स्वहस्ताक्षरात लिहिलेल्या मृत्यूपत्राला स्वलिखित मृत्यूपत्र म्हणतात.

**(४) नोंदणीकृत मृत्यूपत्र (Registered Will)**: नोंदणी कायदा, १९०८, कलम १७ अन्वये नोंदणी केलेल्या मृत्यूपत्राला नोंदणीकृत मृत्यूपत्र म्हणतात. मृत्यूपत्राची नोंदणी करता येते, रुपये शंभरच्या स्टँपपेपरवर मृत्यूपत्र नोंदणीकृत केलेले

असल्यास पुढे कायदेशीर अडचणी उद्भवत नाहीत. तथापि, नोंदणी कायदा, १९०८, कलम १८ अन्वये मृत्यूपत्र नोंदणीकृत असणे आवश्यक नाही.

**(५) जमा केलेले मृत्यूपत्र (Deposited Will)**: नोंदणी कायदा, १९०८, कलम ४२ अन्वये मृत्यूपत्र, पाकीटात बंद/सील करुन निबंधकाकडे जमा करता येते. याला जमा केलेले मृत्यूपत्र म्हणतात.

☞ **मृत्यूपत्र करण्यास सक्षम व्यक्ती:** भारतीय वारसा कायदा, १९२५, कलम- ५९ अन्वये:

* मृत्यूपत्र करणारी व्यक्ती वयाने सज्ञान असावी तसेच तिचे मानसिकदृष्ट्या सुदृढ असावी.
* हिंदू स्त्री, तीने तिच्या जीवनकाळात स्वकष्टाने कमावलेली कोणतीही मालमत्ता मृत्यूपत्राने देऊ शकते.
* मुक किंवा बधीर किंवा अंध व्यक्ती, जर त्यांना परिणामांची जाणीव असेल तर, मृत्यूपत्र करु शकतात.
* मृत्यूपत्र स्वसंपादित संपत्तीबाबत तसेच वंशपरंपरेने मिळालेल्या संपत्तीतील फक्त स्वत:च्या हिश्शाबाबत करता येते.
* हिंदू वारसा कायदा, १९५६, कलम ३० अन्वये हिंदू व्यक्तीला एकत्र कुटुंबाच्या मिळकतीमधील स्वत:च्या हिश्शाबाबत मृत्यूपत्र करता येते.
* वेडसर व्यक्ती, जेव्हा वेडाच्या भरात नसेल तेव्हा मृत्यूपत्र करु शकते. परंतू वेडाच्या भरात, नशेत, आजारात, शुद्धीवर नसताना, फसवणुकीने, दबावाखाली करण्यात आलेले मृत्यूपत्र विधीग्राह्य असणार नाही.

☞ **मृत्यूपत्र रद्द करणे/त्यात बदल करणे:** भारतीय वारसा कायदा, १९२५, कलम- ६२ अन्वये:

मृत्यूपत्र करणारी व्यक्ती, त्याने केलेले मृत्यूपत्र रद्द करु शकते किंवा त्यात कितीही वेळा बदल किंवा दुरुस्ती करू शकते.

☞ **मृत्यूपत्र कसे असावे:** भारतीय वारसा कायदा, १९२५, कलम- ६३ अन्वये:

* मृत्यूपत्रावर, मृत्यूपत्र करणाऱ्या व्यक्तीने, मृत्यूपत्र त्याने स्वत: केले आहे हे दर्शविण्याची निशाणी म्हणून त्यावर स्वाक्षरी किंवा अंगठा किंवा इतर निशाणी केलेली असावी. मृत्यूपत्र करणारी व्यक्ती जर स्वाक्षरी करण्यास असमर्थ असेल तर, इतर कोणतीही व्यक्ती, मृत्यूपत्र करणाऱ्या व्यक्तीच्या निर्देशानुसार, मृत्यूपत्र करणाऱ्या व्यक्तीच्या समक्ष मृत्यूपत्रावर स्वाक्षरी करु शकते.
* किमान दोन किंवा अधिक साक्षीदारांनी, त्यांची नावे, वय, पत्ता व स्वाक्षरीसह, असे मृत्यूपत्र साक्षांकीत केलेले असावे.

☞ **मृत्यूपत्रातील इतर मजकूर:**

* मृत्यूपत्रात उल्लेख केलेल्या मिळकतीबाबत पुरेसे आणि निश्चित वर्णन मृत्यूपत्रात असावे.
* मृत्यूपत्रात उल्लेखित मिळकत मृत्यूपत्र करणाऱ्याकडे कशी आली आणि मृत्यूनंतर त्या मिळकतीची विल्हेवाट कोणी व कशी लावावी याबाबत स्पष्ट उल्लेख असावा.
* मृत्यूपत्रात शेवटी, मृत्यूपत्र स्वतंत्रपणे, शारीरिक व मानसिकरित्या सुदृढ असतांना आणि विचारपूर्वक केलेले असल्याचा उल्लेख असावा.
* मृत्यूपत्रात शेवटी किंवा स्वतंत्रपणे, मृत्युपत्र करणारी व्यक्ती, मृत्यूपत्र करण्यास, शारीरिक व मानसिकरित्या सुदृढ असल्याबाबत डॉक्टरचे प्रमाणपत्र असावे. असे प्रमाणपत्र मृत्यूपत्राचाच भाग असावा. यामुळे पुढे कायदेशीर अडचणी उद्भवत नाहीत.

* हिंदू व्यक्ती स्वसंपादित संपत्तीबाबत तसेच वंशपरंपरेने मिळालेल्या संपत्तीतील फक्त स्वत:चा हिस्सा, अशा एकूण मिळकतीची विल्हेवाट कशी लावावी यासाठी मृत्यूपत्र करू शकते.
* मुस्लिम धर्मीयाने मुस्लीम कायद्यानुसार आपले मृत्यूपत्र केले असेल तरच ते परिणामक्षम मृत्यूपत्र ठरते.
* कोणतेही मृत्यूपत्र हे मृत्यूपत्र करणाऱ्या व्यक्तीच्या मृत्यूनंतरच अंमलात येऊ शकते.
* मृत्यूपूर्वी मृत्यूपत्रात बदल करणे, ते रद्द करणे, नष्ट करणे, नवीन मृत्यूपत्र करणे इत्यादी करण्याचे अधिकार, मृत्यूपत्र करणाऱ्या व्यक्तीला असतात.
* आधीचे मृत्यूपत्र रद्द करुन नवीन मृत्यूपत्र करतांना, "आधीचे, दिनांक ...रोजी केलेले मृत्यूपत्र रद्द समजावे" असा उल्लेख नवीन मृत्यूपत्रात असणे अपेक्षीत आहे.
* एकाच व्यक्तीने, एकापेक्षा जास्त मृत्यूपत्र एकाच व्यक्तीचे असतील तर त्याने सर्वात शेवटच्या दिनांकास केलेले मृत्यूपत्र ग्राह्य मानले जाते.

☞ **हिंदू स्त्रिया/विधवा:** हिंदू स्त्रियांना किंवा विधवांना स्त्रीधन म्हणून मिळालेली, स्वकष्टार्जित आणि वारसा हक्काने मिळालेली मालमत्ता ही त्यांच्या पूर्णत: मालकीची असते. त्यामुळे अशा मिळकतींबाबत हिंदू स्त्रियांना किंवा विधवांना मृत्यूपत्र करता येते.

☞ **विशेष मृत्यूपत्र:** भारतीय वारसा कायदा, १९२५, कलम ६५ अन्वये:
* एखाद्या सज्ञान सैनिकाने प्रत्यक्ष युद्धाच्या वेळेस किंवा विशेष मोहीमेवर असतांना, किंवा एखाद्या सज्ञान दर्यावर्दीने जहाजावर असतांना किंवा एखाद्या सज्ञान वैमानिकाने, विमानात असतांना केलेल्या मृत्यूपत्राला विशेष मृत्यूपत्र म्हणतात.
* भारतीय वारसा कायदा, १९२५, कलम ६६ अन्वये असे विशेष मृत्यूपत्र लेखी अथवा तोंडी असू शकते.
* जर असे मृत्यूपत्र वर नमूद व्यक्तींनी स्वहस्ताक्षरात लिहिलेले असेल तर त्यावर त्याची स्वाक्षरी असण्याची आणि ते साक्षीदारांमार्फत साक्षांकीत असण्याची आवश्यकता नाही.
* जर अशा मृत्यूपत्राचा काही भाग वर नमूद व्यक्तींच्या स्वहस्ताक्षरात असेल आणि काही भाग इतर व्यक्तीने लिहिले असेल आणि त्याखाली असे मृत्यूपत्र करणाऱ्या व्यक्तीची स्वाक्षरी असेल तर ते साक्षीदारांमार्फत साक्षांकीत असण्याची आवश्यकता नाही.
* विशेष मृत्यूपत्र जर इतर व्यक्तीने लिहिले असेल आणि त्याखाली असे मृत्यूपत्र करणाऱ्या व्यक्तीची स्वाक्षरी नसेल आणि असे विशेष मृत्यूपत्र, वर नमूद व्यक्तींच्या निर्देशानुसार लिहिले गेले असे सिध्द करण्यारत आले तर असे विशेष मृत्यूपत्र विधीग्राह्य मृत्यूपत्र समजण्यात येते.

☞ **साक्षीदार वारस:** भारतीय वारसा कायदा, १९२५, कलम ६८ अन्वये:
कोणत्याही मृत्यूपत्रावर साक्षीदार म्हणून स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीला, त्या मृत्यूपत्रात नमूद संपत्तीत वाटा मिळत असल्यास किंवा अशा साक्षीदार व्यक्तीला, मृत्यूपत्र करणाऱ्या व्यक्तीने मृत्यूपत्राचा व्यवस्थापक (Executor) म्हणून नेमलेले असले तरी तिच्या साक्षीदार असण्यावर परिणाम होणार नाही.

☞ **कोडिसिल (Codicil):** भारतीय वारसा कायदा, १९२५, कलम ७० अन्वये:
कोडिसिल म्हणजे एक असा दस्त ज्याद्वारे मृत्युपत्रातील मजकुरासंबंधात स्पष्टीकरण दिलेले आहे किंवा बदल केलेला आहे किंवा अधिक माहिती जोडलेली (add) आहे. कोडिसिलचा दस्त मृत्युपत्राचा एक भाग मानला जातो.

☞ **मृत्यूपत्रातील लेखन प्रमाद:** भारतीय वारसा कायदा, १९२५, कलम ७६ अन्वये:
मृत्यूपत्रातील नाव, क्रमांक इत्यादींबाबतचा लेखन प्रमाद, त्याचा नेमका अर्थ लक्षात येत असेल तर दुर्लक्षित करण्यात यावा.

☞ **मृत्यूपत्रातील विसंगत प्रदाने:** भारतीय वारसा कायदा, १९२५, कलम ८८ अन्वये:
जर एखाद्या मृत्यूपत्रात नमूद दोन कलमात नमूद इच्छा दाने विसंगत असतील आणि त्या दोन्ही इच्छा एकत्रपणे पूर्ण करणे शक्य नसेल तर शेवटी नमूद इच्छा विधिग्राह्य ठरेल.
***<u>उदाहरण १.</u>*** एका मृत्यूपत्र करणाऱ्या व्यक्तीने, त्याच्या मृत्यूपत्रातील पहिल्या कलमामध्ये, त्याची 'क्ष' ठिकाणी असणारी मालमत्ता 'अ' ला द्यावी असे नमूद केले आणि त्याच मृत्यूपत्रात, दुसऱ्या कलमामध्ये, त्याची 'क्ष' ठिकाणी असणारी मालमत्ता 'ब' ला द्यावी असे नमूद केले.
एकच मालमत्ता एकत्रपणे दोघांना देणे शक्य नसल्याने ही दोन्ही कलमे विसंगत ठरतात व शेवटचे कलम विधिग्राह्य ठरुन अशी मालमत्ता 'ब' ला मिळेल.
***<u>उदाहरण २.</u>*** एका मृत्यूपत्र करणाऱ्या व्यक्तीने, त्याच्या मृत्यूपत्रातील पहिल्या कलमामध्ये, त्याची 'क्ष' ठिकाणी असणारे घर 'अ' ला द्यावे असे नमूद केले आणि त्याच मृत्यूपत्रात, शेवटच्या कलमामध्ये असे नमूद केले की, त्याचे 'क्ष' ठिकाणी असणारे घर विकुन टाकावे आणि येणाऱ्या रक्कमेचा विनियोग 'ब' साठी करण्यात यावा.
एकच घर 'अ' ला देणे आणि तेच घर विकुन येणाऱ्या रक्कमेचा विनियोग 'ब' साठी करणे या दोन्ही गोष्टी एकत्र करणे शक्य नसल्याने ही दोन्ही कलमे विसंगत ठरतात व शेवटचे कलम विधिग्राह्य ठरुन घर विकुन येणाऱ्या रक्कमेचा विनियोग 'ब' साठी करणे विधिग्राह्य ठरेल.

☞ **नाते (Relations):** भारतीय वारसा कायदा, १९२५, कलम ९९ अन्वये नात्यांची व्याख्या दिलेली आहे.

☞ **गर्भस्थ शिशू:** हिंदू डिस्पोझिशन्स ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट, १९१६ च्या तरतुदी अस्तित्वात असल्याने गर्भस्थ शिशूच्या नावे मृत्यूपत्र करता येते.

✓ अशाप्रकारे मृत्यूपत्राने वारसा हक्क सांगणाऱ्या व्यक्तीने मृत्यूपत्र हजर केल्यानंतर त्यामध्ये वरील पैलूबाबत काही अपूर्णता आहे का हे प्रथम पहावे. त्याबाबत कुणाची हरकत अगर तक्रार नसल्यास अधिकार अभिलेखात मृत्यूपत्रातील तरतुदीप्रमाणे बदल करणेस हरकत नाही. मृत्यूपत्राबाबत काही वाद असतील तर सक्षम दिवाणी न्यायालयातून हक्काबाबत निर्णय होईपर्यंत अशा मृत्यूपत्राची नोंद करु नये.

**<u>मृत्युपत्र शाबित करणे (Probate of Will):</u>** प्रोबेट म्हणजे अशी कायदेशीर प्रक्रिया ज्यात भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ कलम ५७, २१३ अन्वये, फक्त मुंबई उच्च न्यायालयाचे मूळ अधिकार क्षेत्र असलेल्या मुंबई, कलकत्ता, चेन्नई याठिकाणचीच दिवाणी न्यायालये मृत्युपत्राची सत्यता (authenticity) प्रमाणित करतात. फक्त याच न्यायालयांना प्रोबेटचा अधिकार आहे. याबाबतचा निर्णय भगवानजी करसनभाई राठोड वि. सुरजमल आनंदराज मेहता या प्रकरणात दिनांक ८ जुलै २००३ रोजी मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे. इतर दिवाणी न्यायालये मृत्यूपत्र योग्य की अयोग्य याबाबत निर्णय देऊ शकतात.

☞ **मृत्यूपत्राबाबत महत्वाचे न्यायनिवाडे :**

* मृत्यूपत्रासाठी कोणताही निश्चित असा नमुना कोणत्याही कायद्यात सांगितलेला नाही. (वेंकटरामा अय्यर वि. सुंदरमबाळ, ए.आर.आर- १९४० मुंबई- ४०२)

* मृत्यूपत्र करणाऱ्याने त्याच्या मालमत्तेची विल्हेवाट त्याच्या मृत्यूनंतर कशी लावावी हे स्पष्ट केल्याशिवाय ते मृत्यूपत्र पूर्णपणे कायदेशीर होत नाही. (अहमद बिन सलाह वि. मोहमद बादशहा, ए.आय.आर. १९७२ एस. सी.)

* १८ वर्षाखालील व्यक्तीने केलेले मृत्यूपत्र अंमलात येऊ शकणार नाही. तसेच जर ती व्यक्ती अज्ञान असतानाच मृत झाली तरी असे मृत्यूपत्र विधिग्राह्य व प्रभावशाली ठरणार नाही. (के. विजयरत्नम वि. सुदरसनराव ए. आय.आर. १९२०, मद्रास-२३७)

* मृत्यूपत्र खरे नाही, ते खोटे आहे हे सिद्ध करण्याची जबाबदारी जो तसा अरोप करतो त्याच्याकडे आहे. (चंद्रकांत मेढी वि. लखेश्वरनाथ ए.आय.आर- १९७६ गोहत्ती पान -९८)

* मृत्यूपत्र हा एक पवित्र दस्त मानला गेला आहे. अशा दस्ताद्वारे मृत व्यक्ती आपल्या संपत्तीच्या विल्हेवाटीबाबतची इच्छा व्यक्त करीत असते. म्हणून मृत्यूपत्राचे एक गंभीर व पवित्र दस्त म्हणून पालन केले गेले पाहिजे. (रामगोपाल लाल वि. ऐपिनकुमार ४९.ए. आय. आर ४१३)

## १५. मुस्लिम धर्मिय व्यक्तीच्या मृत्यूपत्राबातच्या तरतुदी

भारतीय वारसा कायदा, १९२५, कलम ५८ अन्वये हा कायदा मुस्लिम व्यक्तीच्या मृत्यूपत्राबाबत (वसियतनामा) लागू होत नाही. मुस्लिम धर्मिय व्यक्तींसाठी मृत्यूपत्राबाबतच्या तरतूदी त्यांच्या 'हेदाय' या बाराव्या शतकातील अधिकृत

ग्रंथात दिलेल्या आहेत. यासंबंधात दुसरा ग्रंथ 'फतवा आलमगिरी' हा सतराव्या शतकात लिहिण्यात आला. 'शराय-उल-इस्लाम' हा ग्रंथ प्रामुख्याने शिया पंथीय मुस्लिमांसाठी आहे.

☞ **स्वाक्षरी:** मुस्लिम धर्मिय व्यक्तीने केलेल्या मृत्यूपत्रावर स्वाक्षरी केली नसेल किंवा त्यावर साक्षीदारांचे साक्षांकन नसले तरी ते मत्यूपत्र वैध मानले जाते.

☞ **सज्ञानता:** मुस्लिम कायद्यानुसार पुरूष व्यक्ती १५ वर्षे वयाचा झाल्यावर त्याला सज्ञान समजले जाते. इंडियन मेजॉरिटी अॅक्ट, १८७५ अन्वये पुरूष व्यक्ती १८ वर्षे वयाचा झाल्यावर त्याला सज्ञान समजतात परंतू जर अशी व्यक्ती अज्ञान असतांना न्यायालयाने त्याच्याबाबत 'पालक' नेमला असेल तर अशी व्यक्ती २१ वर्षे वयाचा झाल्यावर त्याला सज्ञान समजतात. इंडियन मेजॉरिटी अॅक्ट, १८७५ हा सर्वधर्मियांना लागू असल्याने मुस्लिम पुरूष व्यक्ती १८ वर्षे वयाचा झाल्यावर सज्ञान समजली जाते. १५ वर्षे वयाची सज्ञानता केवळ विवाह, तलाक. मेहेर यांसाठीच लागू आहे.

☞ **गर्भस्थ शिशू:** मुस्लिम धर्मानुसार त्याच व्यक्तीच्या नावे मृत्यूपत्र करता येते जी मृत्यूपत्र करणाऱ्या व्यक्तीच्या मृत्यूच्यावेळी जीवित असेल. तथापि, मृत्यूपत्र करण्याच्यावेळी गर्भात असणाऱ्या शिशूचा जन्म मृत्यूपत्र करणाऱ्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर सहा महिन्यात झाला तर त्याच्या नावे केलेले मृत्यूपत्र ग्राह्य मानले जाते.

☞ **मर्ज-उल-मौत:** मुस्लिम धर्मिय व्यक्तीला त्याचा दफन खर्च व कर्ज फेडीसाठी आवश्यक रक्कम सोडून, त्याच्या संपत्तीच्या १/३ संपत्तीपुरते मृत्यूपत्र कोणत्याही वारसांच्या संमतीशिवाय करता येते. १/३ संपत्तीपेक्षा जास्त संपत्तीचे मृत्यूपत्र वारसांच्या संमतीनेच वैध होते.

☞ **प्रोबेट:** भारतीय वारसा कायदा, १९२५ चे कलम २१३ मुस्लिम व्यक्तीला लागू होत नाही. त्यामुळे त्यांना प्रोबेटची आवश्यकता नाही.

☞ **अमान्य तत्व:** मुस्लिम कायद्याला अविभक्त कुटुंब, मृत व्यक्ती मागे जिवंत असणारे, वारसा हक्क, जन्मसिध्द हक्क, ज्येष्ठ मुलाचा हक्क अशी तत्वे मान्य नाहीत. एखाद्या व्यक्तीचा मुलगा, त्या व्यक्तीच्या जिवंतपणी मयत झाला तर मयताच्या मुलाला मालमत्तेत कोणताही हक्क नसतो.
पवित्र कुराणात, सर्व रक्त संबंधी, लग्नामुळे झालेले संबंधी हे जवळचे वारस (शेअरर) मानले जातात. मुस्लिम कायद्यान्वये पवित्र कुराणात ठरवून दिल्याप्रमाणे सर्व वारसांना हिस्सा मिळतो.
मुस्लिम सुन्नी हनफी कायद्यानुसार मुस्लिम व्यक्ती मयत झाल्यानंतर त्याच्या पत्नीला मयत व्यक्तीच्या मालमत्तेतील १/८ ठराविक हिस्सा मिळतो. मयत मुस्लिम व्यक्तीस दोन पत्नी असतील तर प्रत्येक पत्नीला १/१६ हिस्सा मिळतो. मयताला मुले असतील तर मुलाला दोन हिस्से आणि मुलीला एक हिस्सा मिळतो.

☞ **अपात्रता:** मुस्लिम कायद्यान्वये ज्या व्यक्तीने आत्महत्त्या करण्यासाठी विष प्राशन केले असेल किंवा स्वत:ला जखमी करुन घेतले असेल अशा व्यक्तीला वसियतनामा करण्याचा अधिकार नसतो.

## १६. वारस दाखले

**वारस दाखला (Legal Heir Certificate):** फक्त मयत शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या वारसांना आवश्यकता असल्यास, मयताच्या भविष्य निर्वाह निधी, ग्रॅच्युइटी इत्यादींची रक्कम मिळणेकामी, वारसांमध्ये कोणताही वाद

नसेल तर, महाराष्ट्र ट्रेझरी नियम, १९६८, नियम ३५९ अन्वये, तहसिलदारांना वारस दाखला देण्याचा अधिकार आहे. असा दाखला प्रदान करण्यापूर्वी तहसिलदारांनी संक्षिप्त चौकशी करणे आवश्यक आहे. हा दाखला फक्त उपरोक्त कारणांसाठीच वापरता येतो. अन्य कोणत्याही कारणांसाठी नाही.

**<u>उत्तराधिकार प्रमाणपत्र (Succession certificates):</u>** उत्तराधिकार म्हणजे अशी प्रक्रिया, ज्यामुळे मृत्युपत्र करणार्याच्या इच्छेनुसार (testator's will) किंवा मृत्युपत्र न करता मयत झालेल्या (intestacy) व्यक्तीची मालमत्ता मिळण्यास लाभार्थी पात्र ठरतात. भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ च्या कलम ३७० अन्वये उत्तराधिकार प्रमाणपत्र प्रदान करण्या ाचा अधिकार फक्त दिवाणी न्यायालयालाच आहे. कोणत्याही मयताच्या स्थांवर मालमत्तेबाबत वारसांमध्ये वाद असल्यास उत्तराधिकार प्रमाणपत्र आवश्यक असते. असे प्रमाणपत्र प्रदान करण्यापूर्वी न्यायालयातर्फे दोन्ही पक्षांना त्याची बाजू आणि पुरावे सादर करण्याची संधी देण्यात येते.

**<u>नामनिर्देशित व्यक्ती (Nominee):</u>** विमा कायद्यान्वये नामनिर्देशित व्यक्तीची तरतूद आहे. नामनिर्देशित व्यक्तीची भुमिका एजंट किंवा विश्वस्त( (trustee) सारखी असते. नामनिर्देशित व्यक्ती म्हणजे वारस किंवा मृत्युपत्रान्वये केलेल्या दानाचा वारस किंवा वारसाचा अन्य प्रकार नाही हे लक्षात ठेवावे. मयताच्या मालमत्तेचे त्याच्या कायदेशीर वारसांमध्ये वाटप करणे हे नामनिर्देशित व्यक्तीचे कर्तव्य असते. मयताच्या मालमत्तेत नामनिर्देशित व्यक्तीला हक्क असेलच असे नाही. मयताच्या मालमत्तेचे वाटप, मयताच्या वारसांमध्ये सुरळीतपणे व्हावे यासाठी निर्माण केली ती एक व्यवस्था आहे.

## १७. शब्दार्थ

**Testator:** अशी व्यक्ती ज्याने मृत्यूपूर्वी मृत्युपत्र केले आहे.

**Intestate:** अशी व्यक्ती ज्याने मृत्यूपूर्वी मृत्युपत्र केलेले नाही.

**Legatee/Beneficiary:** अशी व्यक्ती ज्याला मृत्युपत्रान्वये मालमत्ता मिळाली आहे.

**Executor:** अशी व्यक्ती ज्याची नेमणूक मृत्युपत्र करणार्याने किंवा आदेशान्वये न्या ायालयाने, मयताच्या मालमत्तेचे मृत्युपत्रानुसार वाटप करण्यासाठी केलेली आहे. अशी व्यक्ती मृत्युपत्र करणार्या मयत व्यक्तीची कायदेशीर प्रतिनिधी म्हणून काम करते.